पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला

● वर्ष १६ ● अंक ८९ ●सोमवार, दि ५ ऑक्टोबर २०२६ ● मूल्य ५ ● पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 ■ Web. https://epaper.citynewssuperfast.com

सिटी न्यूज सुपरफास्ट
बार्शिटाकळी शहरात
अंक मिळण्यासाठी व जाहिरातींसाठी
संपर्क
आजम खान
तालुका प्रतिनिधी
+91 7875280943

सुविचार

प्रामाणिकपणा आणि कठोर परिश्रमाने खरे यश मिळते

## »थोडक्यात

### विद्यार्थी आंदोलन : शरद पवारांची मुख्यमंत्र्यांसोबत चर्चा

पुणे : विद्यार्थ्यांना न्याय देण्याची सरकारची नैतिक जबाबदारी आहे. विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर मार्ग निघायला हवा. सुसंवाद असायला हवा. चर्चा झाली नाही तर प्रश्न सुटणार नाहीत. विद्यार्थ्यांच्या भावना लक्षात घेऊन मार्ग काढला जावा, असे मत राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी व्यक्त केले. आंदोलकांच्या शिष्टमंडळाने रविवारी ज्येष्ठ नेते शरद पवार यांची भेट घेत मागण्यांबाबत चर्चा केली. त्यावर पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी फोनवरून चर्चा केली. तसेच योग्य मार्ग काढू, असा विश्वास त्यांनी दिला. पेपरफुटीच्या घटना व भ्रष्टाचाराचे आरोप याची दखल घेत सरकारने राज्य लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षांचा राजीनामा घ्यावा, अशी आग्रही मागणी होत आहे.

---

### मुंबई शेअर बाजारात उसळी!

मुंबई : गेल्या आठवड्यातील निराशाजनक कामगिरीनंतर आज ५ ऑक्टोबर रोजी भारतीय शेअर बाजाराची सुरुवात तेजीसह झाली. यामुळे गेल्या काही आठवड्यांपासून सलगपणे पैसे गमावणाऱ्या गुंतवणूकदारांना लाखो कोटी रुपयांचा लाभ झाला आहे. सकाळी बाजार उघडताच सेन्सेक्समध्ये जवळपास ५०० अंशांची वाढ होऊन तो ७२,४०० च्या वर व्यवहार करू लागला, तर निफ्टी ५० मध्ये १४० हून अधिक अंशांची वाढ होऊन तो २२,५६० च्या वर पोहोचला होता. व्यापक बाजारानेही चांगली सुरुवात केली. यात निफ्टी स्मॉलकॅप १०० आणि निफ्टी मिडकॅप १०० या निर्देशांकांमध्ये प्रत्येकी ०.८ टक्क्यांहून अधिक वाढ झाली.

---

### बस-दुचाकीच्या अपघातात बापलेकीसह एका नातेवाइकाचा मृत्यू

पैठण : छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण येथे अरुंद रस्त्यावरील वळणावर नियंत्रण सुटल्याने एसटी बस आणि दुचाकीची समोरासमोर धडक होऊन भीषण अपघात झाला. यात दुचाकीवरील बापलेकीसह एका नातेवाइकाचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. या अपघाताचा सीसीटीव्ही देखील आता समोर आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अशोक भालेराव, कृष्णा गायकवाड आणि ऋतुजा ऊर्फ छकुली कृष्णा गायकवाड अशी मृतांची नाव आहेत.

# दुष्काळात पिण्याच्या पाण्याला प्राथमिकता!

## महसूलमंत्री बावनकुळे : विदर्भातील जंगलांत चारा पिकवणार

प्रतिनिधी ५ ऑक्टोबर

**मुंबई :** पुढील आठ महिने कोणत्या शहराला आणि गावाला किती पाणी लागेल, याचा काटेकोर अंदाज घेण्यात आला आहे. त्यानुसारच पाण्याचे नियोजन केले जाईल. पिण्याचे पाणी ही आमची सर्वोच्च प्राथमिकता असून, आरक्षणाशिवाय शेती किंवा उद्योगांना विनाकारण पाणी सोडले जाणार नाही, असे सांगत राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्यातील दुष्काळी उपाययोजनांची माहिती दिली. दुष्काळग्रस्त भागात जनावरांच्या चाऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर



महसूलमंत्र्यांनी एका नाविन्यपूर्ण योजनेची घोषणा केली. 'विदर्भात मोठ्या प्रमाणावर जंगले आहेत. त्या ठिकाणी 'ग्रासलँड डेव्हलपमेंट' (गवताळ कुरणांचा विकास) करून उत्तम प्रतीचे चाऱ्याचे बियाणे पुरवले जाईल आणि मोठ्या प्रमाणावर चारा उत्पादन केले जाईल. हा चारा दुष्काळग्रस्त जिल्ह्यांमध्ये जनावरांसाठी पाठवला जाईल. या संदर्भात कालच वन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठक झाली असून, यासाठी लागणारा संपूर्ण निधी राज्य सरकार तातडीने उपलब्ध करून देणार आहे.विदर्भातील वनजमिनींवर 'ग्रासलँड डेव्हलपमेंट'द्वारे चारा निर्मिती, धरणातील पिण्याच्या पाण्याचे काटेकोर नियोजन, मुंबईतील विद्यार्थी आंदोलने, विधान परिषदेतील जागावाटप आणि मुंबई विमानतळाच्या धावपट्टी दुरुस्तीवरून आदित्य ठाकरेंनी केलेल्या टीकेवर सविस्तर भाष्य महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पत्रकार परिषेदत बोलताना केले.

### अन्नदाता आपला आदरतिथ्य धर्म विसरला नाही

शेतकऱ्यांसोबत बांधावर बसून जेवतानाचा व्हिडिओबाबत विचारले असता ते म्हणाले, आम्ही बांधावर पाहणी करत असताना शेतकरी स्वतःचे डबे घेऊन आले होते. त्यांनी अत्यंत हक्काने आणि आग्रहाने विनंती केली की, 'साहेब, तुम्ही आला आहात तर आमच्यासोबत दोन घास खा.' आम्ही त्यांच्यासोबत झुणका, भाकरी आणि ठेचा खाल्ला. शेतकऱ्यावर अस्मानी संकट आहे, तो प्रचंड अडचणीत आहे; तरीही अन्नदाता आपला आदरतिथ्य धर्म विसरत नाही, हेच यातून सिद्ध होत असल्याचे महसूल मंत्री म्हणाले.

# कॅप्टन स्मित यांच्या प्रकृतीसाठी अकोल्यात जलाभिषेक....!

प्रतिनिधी ५ ऑक्टोबर

**अकोला :** दुबई विमानातील घटनेनंतर चर्चेत आलेले कॅप्टन स्मित माच्छार यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी, यासाठी अकोल्यात त्यांच्या मामांनी श्री राज राजेश्वर मंदिरात जलाभिषेक करून प्रार्थना केली.

कॅप्टन स्मित मच्छार यांचे मामा राजेंद्र जोगी यांनी आज श्री राज राजेश्वर मंदिरात जलाभिषेक केला. यावेळी कॅप्टन मच्छार यांच्या प्रकृतीसाठी प्रार्थना करण्यात आली. त्यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा होऊन ते पूर्णपणे बरे व्हावेत, अशी भावना



यावेळी व्यक्त करण्यात आली. या प्रार्थनेच्या वेळी आरआरसीचे कार्यकारी संघटित संचालक पंकज देशमुख यांचीही उपस्थिती होती. कॅप्टन मच्छार यांच्या प्रकृतीबाबत अकोल्यातूनही चिंता व्यक्त होत असून, त्यांच्या लवकर बरे होण्यासाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत. दुबई विमानातील घटनेनंतर कॅप्टन स्मित मच्छार यांची धाडसी भूमिका चर्चेत आली आहे. त्यांच्या प्रकृतीसाठी कुटुंबीयांसह नागरिकांकडूनही प्रार्थना केली जात आहे.

# अकोल्याला 'ऑक्टोबर हीट'चा तडाखा!

## रविवारी सर्वाधिक 37.1 अंश तापमानाची नोंद

प्रतिनिधी ५ ऑक्टोबर

**अकोला :** आधीच अकोल्याची सर्वाधिक 'हॉट' शहर म्हणून जागतिक पातळीवर ओळख आहे. त्यात रविवारी आणखी भर पडली आहे. ऑक्टोबर हीटचा तडाखा अकोलेकरांना बसत असून, रविवार, ४ ऑक्टोबरला राज्यात सर्वाधिक ३७.१ अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. दुपाराच्या सुमारास सूर्य आग ओकत असल्याने शहरवासीयांच्या जीवाची लाही-लाही होत आहे.



विदर्भात ऑक्टोबर हिटचा प्रभाव अधिक जाणवत असून अकोला येथे तापमान जास्त असल्याने शहरवासी घामाच्या धारांनी व उकाड्याने हैराण झाले आहेत. दुपारच्या सुमारास रस्त्यावरील वर्दळही कमी होत आहे. ऑक्टोबर सुरू होताच राज्यात उष्णतेचा चटका जाणवू लागला आहे. याचा परिणाम अकोल्यावरही होत आहे.अकोल्यात रविवारी कमाल तापमान ३७.१ अंश सेल्सिअस नोंदविण्यात आले. हे तापमान राज्यात सर्वाधिक होते. अमरावती ३६.४, चंद्रपूर ३६.४, वर्धा ३६, बुलढाणा ३५.२, ब्रह्मपुरी ३५.२, नागपूर ३५ आणि वाशिम ३५ अंश अशा तापमानाची नोंद झाली. मराठवाड्यातही उष्णता जाणवत असून छत्रपती संभाजीनगर येथे ३६ अंश, परभणी ३५.३ अंश आणि धाराशिव ३३.१ अंश कमाल तापमान नोंदविण्यात आले. विदर्भात ऑक्टोबर हिटचा प्रभाव अधिक जाणवत असल्याचे तापमानाच्या आकडेवारीवरून दिसून येत आहे.

# 15 लाखांच्या खंडणी प्रकरणी सागर भारुकाविरुद्ध गुन्हा दाखल

## शिवसेना शिंदे गटाचे नगरसेवक पोलिसांच्या ताब्यात

प्रतिनिधी ५ ऑक्टोबर

**अकोला :** शहरातील सिव्हिल लाइन पोलीस स्टेशन अंतर्गत मध्यवर्ती बसस्थानकाच्या मागील परिसरातील कृष्णा एम्पेरियल हॉटेलमध्ये शनिवारी रात्री वाद झाला. हॉटेलमध्ये जेवणासाठी गेलेल्या शिवसेना शिंदे गटाचे नगरसेवक सागर भारुका यांनी हॉटेलच्या कॅशियरसोबत हुज्जत घालत शिवीगाळ व मारहाण केल्याचा, तसेच हॉटेल व्यवसाय सुरू ठेवायचा असेल तर १५ लाखाची मागणी केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. याप्रकरणी सिव्हिल लाइन पोलिसांनी भारुका यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून त्यांना ताब्यात घेतले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ३ ऑक्टोबर रोजी रात्री १२ वाजताच्या सुमारास नगरसेवक सागर भारुका हे काही मित्रांसह कृष्णा एम्पेरियल हॉटेलमध्ये जेवणासाठी गेले होते. यावेळी हॉटेलमधील कॅशियर शोयब अख्तर जमील अख्तर यांच्याकडे जेवणाची मागणी करण्यात आली. त्यानंतर काही कारणावरून कॅशियरसोबत वाद झाला. तक्रारीनुसार, या वादाचे रूपांतर हुज्जत, शिवीगाळ आणि मारहाणीत झाले. हॉटेलमध्ये नेमका वाद कोणत्या कारणावरून झाला, १५ लाख रुपयांची मागणी करण्यात आली का आणि मारहाणीच्या आरोपांबाबत गुन्हा दाखल झाल्यानंतर सिव्हिल लाइन पोलिसांनी नगरसेवक सागर भारुका यांना ताब्यात घेतले. त्यांची रात्री वैद्यकीय तपासणी करण्यात आली. या प्रकरणात पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू असून, ५ ऑक्टोबर रोजी त्यांना न्यायालयात हजर करण्यात येणार आहे, अशी माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील यांनी दिली. हा प्रकार एवढ्यावरच थांबला नाही, तर हॉटेल आपल्या प्रभागात येत असल्याचे सांगत हॉटेल सुरू ठेवायचे असेल तर १५ लाख रुपये आत्ताच्या आता द्यावे लागतील, अशी धमकी दिल्याचा आरोप कॅशियरने तक्रारीत केला आहे. नेमकी वस्तुस्थिती काय आहे, याचा तपास सिव्हिल लाइन पोलीस करीत आहेत.

### सुप्रिम कोर्टाची ज्ञानेश कुमार यांना नोटीस!

नवी दिल्ली : केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कार्यपद्धतीवर आणि त्यांनी घेतलेल्या एकतर्फी निर्णयांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणाऱ्या याचिकांवर आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाची गंभीर दखल घेत केंद्रीय निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि दोन्ही निवडणूक आयुक्तांना नोटीस बजावली आहे. सुनावणीदरम्यान याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी न्यायालयाकडे तातडीच्या हस्तक्षेपाची मागणी केली. विशेष सखोल पुनरावलोकन प्रक्रियेशी संबंधित निर्णयांच्या विरोधात ज्ञानेश कुमार यांच्यावर याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. त्यात एसआयआरशी संबंधित १४ निर्णय इतर दोन निवडणूक आयुक्तांच्या सहमतीशिवाय घेण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

# अमरावती–सुरत एक्स्प्रेसमध्ये तांत्रिक बिघाड

## काटेपूर्णा–बोरगावदरम्यान रेल्वे वाहतूक विस्कळीत

प्रतिनिधी ५ ऑक्टोबर

**मुर्तीजापुर :** अमरावतीहून सुरतकडे जाणाऱ्या अमरावती–सुरत एक्स्प्रेसला काटेपूर्णा आणि बोरगाव मंजू स्थानकादरम्यान सोमवारी सकाळी तांत्रिक बिघाड झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. रेल्वेच्या प्रेशर पाईपमध्ये बिघाड झाल्याने गाडी 50 मिनट पासून ठप्प झाली आहे. या घटनेमुळे प्रवाशांमध्ये मोठी धावपळ उडाली असून, अकोला येथून पुढील प्रवासासाठी अनेक प्रवाशांना दुसऱ्या रेल्वेगाडीचा आधार घ्यावा लागत आहे.

प्राथमिक माहितीनुसार, काटेपूर्णा– बोरगावदरम्यान रेल्वेगाडीच्या दोन रुळांच्या मधोमध मोठा दगड आल्याने हा प्रकार घडल्याची चर्चा काही प्रवाशांमध्ये सुरू आहे. मात्र, दगडामुळेच बिघाड झाला की अन्य तांत्रिक कारणामुळे



प्रेशर पाईपमध्ये समस्या निर्माण झाली, याबाबत रेल्वे प्रशासनाकडून अधिकृत माहिती अद्याप स्पष्ट झालेली नाही.

गाडीमध्ये बिघाड झाल्यानंतर प्रवाशांना काही काळ रेल्वेतच थांबावे लागले. अकोला येथून पुढे विविध ठिकाणी जाणाऱ्या प्रवाशांची मोठी गैरसोय झाली. काही प्रवाशांना आपला पुढील प्रवास सुरू ठेवण्यासाठी अकोला रेल्वे स्थानकावर उतरून दुसरी ट्रेन पकडावी लागत असल्याने स्थानकावर गर्दी आणि गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.

दरम्यान, रेल्वे प्रशासनाच्या तांत्रिक पथकाकडून बिघाड दुरुस्त करण्याचे काम सुरू असल्याची माहिती आहे. बिघाड नेमका कशामुळे झाला आणि रेल्वे वाहतूक पूर्ववत होण्यासाठी किती वेळ लागणार, याबाबत प्रवाशांकडून रेल्वे प्रशासनाकडे माहिती घेतली जात आहे.

या घटनेमुळे अमरावती–अकोला मार्गावरील रेल्वे प्रवाशांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत असून, प्रशासनाने तातडीने बिघाड दुरुस्त करून रेल्वे वाहतूक सुरळीत करावी, अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे.

# शहरात चाललंय तरी काय?

## तेलीपुरा चौकात युवकावर चाकूने हल्ला; सीसीटीव्हीत हल्लेखोर कैद

प्रतिनिधी ५ ऑक्टोबर

अकोला: शहरातील तेलीपुरा चौक परिसरात भर रस्त्यावर एका युवकावर दोन अज्ञात युवकांनी कथितरित्या चाकूने हल्ला केल्याची घटना समोर आली आहे. या घटनेनंतर परिसरात काही काळ खळबळ उडाली.जखमी युवकाचे नाव सय्यद शाकीर सय्यद अशरफ असे असून तो जुन्या शहरातील नबाबपुरा परिसरातील राहणार असल्याचे सांगितले जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, काही कारणावरून दोन अज्ञात युवकांनी शाकिर यांच्यावर हल्ला केला. यातील एका व्यक्तीने चाकूने वार करून त्याला जखमी केल्याचे सीसीटीव्ही फुटेज मध्ये स्पष्ट दिसत आहे. हल्ल्यात जखमी झालेला शाकीर एका दुकानाजवळ



घायाळ अवस्थेत बराच वेळ बसून होता. त्यानंतर स्थानिक नागरिकांनी त्यांना उपचारासाठी अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (GMC) रुग्णालयात दाखल केले. त्यानंतर पुढील उपचारासाठी त्यांना एका खासगी रुग्णालयात हलविण्यात आल्याची माहिती आहे. हल्ला नेमका कोणी केला आणि हल्ल्यामागील कारण काय, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. पोलिसांकडून या प्रकरणाचा तपास सुरू असून हल्लेखोरांची ओळख सीसीटीव्ही फुटेज वरून पटविण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

### गुन्हेगारांवर अंकुश लावणे गरजेचे

शहरात मागील काही दिवसांपासून हत्या, मारामाऱ्या, थोड्या वादातून शस्त्र काढणे अशा घटनांमध्ये वाढ झाल्याचे दिसून येत आहे विशेषता अल्पवयीन युवकांच्या टोळ्या सुद्धा लहान सहान कारणांवरून कोणालाही मारावयास मागेपुढे पाहत नाहीत. त्यामुळे दहशत निर्माण करणाऱ्यांवर पोलिसांचीच दहशत नसल्याचे दिसून येत आहे. हे पाहता जिल्हा पोलीस अधीक्षकांनी दहशत निर्माण करणाऱ्यांवर अंकुश लावण्याचे आदेश आपल्या कर्मचाऱ्यांना दिले पाहिजेत अशी मागणी होत आहे.






# कॅप्टन स्मित मच्छारचे आजोळ अकोल्याचे भाजपकडून जोगी परिवाराचे स्वागत

प्रतिनिधी ५ ऑक्टोबर

**अकोला** : कॅप्टन स्मित मच्छार यांच्या आईचे माहेर राजराजेश्वर नगरीत असून लहानपणीच्या आठवणींना त्यांनी उजाळा दिला. भारतीय जनता पार्टीच्या वतीने जोगी परिवाराचे स्वागत करण्यात आले. त्यांचे मामा मामी व परिवाराशी संवाद साधण्यात आला. कॅप्टन स्मित यांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यात आली. त्यांची आई गीताबेन आणि वडील रमेश यांच्याशी देखील संवाद साधून त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यात आली.



१७४ विमान प्रवाशांचे प्राण वाचवणे अकोलेकरांसाठी अभिमानाची बाब आहे. इस्रायलने आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्मितला स्वातंत्र्य दिनानिमित्त दिल्लीत आमंत्रित केले आहे, ही सुद्धा अकोलेकरांसाठी गौरवाची बाब आहे, असे प्रतिपादन खासदार अनुप धोत्रे यांनी केले.

मामा-मामी, आई-वडिल, आजी-आजोबांचे संस्कार आणि सनातन धर्माची प्रेरणा घेऊन कार्यरत असलेले कॅप्टन स्मित यांचे आमदार रणधीर सावरकर यांनी अभिनंदन केले. यावेळी 'भारत माता की जय', 'जय श्रीराम', 'वंदे मातरम', 'हर हर महादेव', 'राजराजेश्वर भगवान की जय', 'संत गजानन महाराज की जय' अशा गगनभेदी जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. यावेळी मामा राजेंद्र जोगी म्हणाले, पक्षाने दिलेला हा सन्मान संपूर्ण अकोलेकरांचा सन्मान आहे. स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांनी सुद्धा जोगी परिवाराचे स्वागत केले. भारतीय जनता पक्षाने कॅप्टन स्मित यांचे कौतुक केले आणि आज देश विदेशात त्यांनी नाव केलं याबद्दल सुद्धा त्यांनी आनंद व्यक्त केला. यावेळी महापौर शारदाताई खेडकर, जयंत मसने, अमोल गोगे, माधव मानकर, गिरीश जोशी, एड. देवाशिष काकड, संजय गोटफोडे, किशोर कुचके, पंकज गावंडे, सोनाली अंधारे, विनोद मापारी, धनंजय धबाले, मंगेश झिने, रूपाली गावंडे, योगिता पावसाळे, गणेश पावसाळे, रणजीत खेडकर, सुदर्शन धोत्रे, पूजा गावंडे, गजानन सोनोने, मनीष गावंडे, वेंकट ढोरे, अजिंक्य राऊत, आम्रपाली उपर्वट, विजय फुकट, विलास शेळके, नितीन टाकवले, अनिल गरड, मंजुषा शेळके, तुषार भिरड, सिद्धार्थ उपर्वट, विजय खिरोडकर, बाळकृष्ण ताले, अजय गरे, रमेश जोशी आधी कार्यकर्ते उपस्थित होते. मामा दीपक जोगी, मामी दिव्या जोगी, राजेंद्र जोगी, संगीता जोगी, सुरेश जोगी, खुशी यांचे शाल, मिठाई देऊन स्वागत करण्यात आले.

# अकोला-खंडवा रेल्वे कामातील टिप्पर घरावर आदळला

## मालठाणा खुर्द येथे मोठे नुकसान



प्रतिनिधी ५ ऑक्टोबर

**तेल्हारा** : अकोला-खंडवा रेल्वे मार्गाच्या कामासाठी वापरण्यात येणारा टिप्पर घरावर आदळल्याची घटना तेल्हारा तालुक्यातील मालठाणा खुर्द येथे घडली. या दुर्घटनेत घराचे मोठे नुकसान झाले असून, सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाल्याचे समोर आले नाही.

रेल्वे मार्गाच्या कामासाठी मोठ्या वाहनांची ये-जा सुरू असताना हा टिप्पर घरावर आदळला. त्यामुळे घराच्या बांधकामाचे नुकसान झाले. घटनेनंतर परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. दरम्यान, रेल्वे कामासाठी ये-जा करणाऱ्या वाहनांबाबत यापूर्वीही गावकऱ्यांकडून तक्रारी करण्यात आल्याचा दावा करण्यात येत आहे. त्यामुळे कामासाठी वापरण्यात येणाऱ्या अवजड वाहनांचा वेग, वाहतुकीची सुरक्षितता आणि गावातून होणारी वाहनांची ये-जा याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. रेल्वेचे काम विकासासाठी महत्त्वाचे असले तरी कामाच्या ठिकाणी तसेच गावातून अवजड वाहनांची वाहतूक करताना नागरिकांच्या सुरक्षिततेची काळजी घेणे आवश्यक आहे. या घटनेनंतर संबंधित यंत्रणा आणि कंत्राटदारांकडून सुरक्षेच्या उपाययोजनांचा आढावा घेतला जाणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# कनुभाई मश्रुवाला चरखा प्रशिक्षण व संशोधन केंद्र कार्यान्वित

प्रतिनिधी ५ ऑक्टोबर

**अकोला** : स्वतंत्रतासेनानी कनुभाई मश्रुवाला यांच्या स्मरणार्थ सर्वोदयी कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन चरखा संस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी कनुभाई मश्रुवाला चरखा प्रशिक्षण व संशोधन केंद्र कलेक्टर कॉलनी येथे स्थापन केले आहे.या केंद्रामार्फत दर रविवारी सकाळी ८ ते १० या वेळेत गांधी जवाहर बागेत शाळा महाविद्यालय विद्यार्थ्यांना चरख्यावर सूतकताई चे प्रशिक्षण देण्यात येत असल्याची माहिती अकोला जिल्हा सर्वोदय मंडळाचे अध्यक्ष बबनराव कानकिरड यांनी दिली. ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी कनुभाई मश्रुवाला हे त्यागी नेतृत्व होते. त्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ चरखा प्रशिक्षण व संशोधन केंद्र कार्यान्वित होत आहे ही बाब अकोलेकरांसाठी वंदनीय असल्याचे प्रतिपादन अ.भा. मराठी पत्रकार परिषदेचे माजी अध्यक्ष सिद्धार्थ शर्मा यांनी केले.

# गांधी-शास्त्रींच्या जीवनकार्याचा विद्यार्थ्यांनी नाटिकेतून जागविला जागर



प्रतिनिधी ५ ऑक्टोबर

**मुर्तीजापूर** : राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या प्रेरणादायी जीवनकार्याला व्यंकटेश बालाजी इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी नाटिकेच्या माध्यमातून उजाळा दिला. गांधीजींचा दांडी मार्च, भारत छोडो आंदोलन, अहिंसा तसेच शास्त्रीजींचे साधेपण, स्वच्छ प्रतिमा, देशनिष्ठा आणि सामान्य जनतेशी असलेली बांधिलकी विद्यार्थ्यांनी प्रभावी अभिनयातून साकारली. कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. गांधीजींच्या भूमिकेत राम घाटे, तर लालबहादूर शास्त्री यांच्या भूमिकेत श्रेयांस घेबाड यांनी प्रभावी सादरीकरण केले. 'अहिंसा परमो धर्म', 'चोरी करणे पाप आहे', तसेच 'बुरा मत सुनो, बुरा मत देखो, बुरा मत बोलो' या संदेशांतून विद्यार्थ्यांनी नैतिक मूल्यांची जाणीव करून दिली. यावेळी स्पर्श देशमुख, सुवर्णश्री देशमुख, युवराज कोल्हे, ईशा बांबल, श्रीजा डिगे व श्रावी इंगळे यांनी गांधीजींच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला.

कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष प्रा. अवधूत ढेरे, सचिव राजश्रीताई गोळे, मुख्याध्यापिका सारिका ताई कदू व पर्यवेक्षिका मीनाक्षी महाजन उपस्थित होत्या. सूत्रसंचालन पूजा ठोकळे यांनी केले, तर आभार मीनाक्षी महल्ले यांनी मानले.

# जनता भाजी बाजाराजवळ आकड्यांचा खेळ; पोलिसांचे दुर्लक्ष?

प्रतिनिधी ५ ऑक्टोबर

**अकोला** : जुने बसस्थानक परिसरातील जनता भाजी बाजाराच्या बाजूला आकड्यांचा खेळ सुरू असल्याचे प्रत्यक्ष पाहणीत दिसून आले. तीन गोल चक्रींच्या माध्यमातून हा खेळ खेळविला जात असून, एका चक्रीवर सातचा आकडा तर अन्य दोन चक्रींवर शून्याचे आकडे दिसून येतात.

या खेळात विशिष्ट आकड्यावर पैसे लावले जात असल्याचे दिसून आले. एखाद्या आकड्यावर जितकी रक्कम लावली जाते, तोच आकडा बरोबर आल्यास लावलेल्या रकमेच्या दुप्पट पैसे दिले जात असल्याचे प्रत्यक्ष पाहणीत समोर आले. उदाहरणार्थ, सात या आकड्यावर १०० रुपये लावून सातच आकडा उघडल्यास २०० रुपये दिले जात असल्याचे दिसून आले.

वर्दळीच्या बाजारपेठेत अशा पद्धतीने पैशांचा खेळ सुरू असताना पोलिसांचे लक्ष कसे गेले नाही, हा प्रश्न उपस्थित होत आहे. परिसरात असे भुरटे सट्टेबाज किती सक्रिय आहेत, याचीही पोलिसांनी माहिती घेणे गरजेचे आहे. सार्वजनिक ठिकाणी सुरू असलेल्या या प्रकाराची पोलिसांनी तातडीने दखल घेऊन चौकशी करावी आणि दोषी आढळणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करावी.

# अधिराज वॉटर पार्कमध्ये युवकाच्या मृत्यू प्रकरणी मालक व ट्रेनर विरुद्ध गुन्हा दाखल

प्रतिनिधी ५ ऑक्टोबर

**अकोट** :अकोट ते जुना बोर्डी रोडवरील अधिराज वॉटर पार्कमधील स्विमिंग पूलमध्ये पोहताना १७ वर्षीय स्पंदन अमोल खाजोने याचा बुडून मृत्यू झाल्याची घटना १८ सप्टेंबर २०२६ रोजी घडली. या प्रकरणी अकोट शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम १०६(१) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. एफ आय आर मधील जबाबानुसार, स्पंदन हा त्याचा लहान भाऊ स्वानंद व मित्रांसोबत अधिराज वॉटर पार्कमध्ये पोहण्यासाठी गेला होता. सर्वजण पोहत असताना काही वेळाने स्पंदन दिसून न आल्याने त्याचा शोध घेण्यात आला. तो स्विमिंग पूलमधील पायरीजवळ पाण्यात बुडालेल्या अवस्थेत आढळून आला. त्याला तातडीने बाहेर काढून ग्रामीण रुग्णालय, अकोट येथे नेण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासून त्याला मृत घोषित केले.

घटनेच्या वेळी वॉटर पार्कमध्ये लाईफगार्ड उपस्थित नव्हता तसेच प्रथमोपचाराचे साहित्य उपलब्ध नव्हते, असा दावा तक्रारदाराच्या जबाबात करण्यात आला आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक व्यवस्था करण्याची जबाबदारी असतानाही उपाययोजना करण्यात आल्या नसल्याचे तक्रारदाराने म्हटले आहे.

या पार्श्वभूमीवर वॉटर पार्कचे मालक सुरेंद्र वसंतराव जोत व ट्रेनर रोहित सुरणे यांच्या निष्काळजीपणामुळे स्पंदनचा मृत्यू झाल्याचा दावा करत त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाईची मागणी करण्यात आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला असून, तपासाची जबाबदारी पोलीस हवालदार इंदलसिंग प्रल्हाद चव्हाण यांच्याकडे सोपविण्यात आली आहे.

# सेंट पॉल्स पब्लिक स्कूलमध्ये महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री जयंती साजरी




**अकोट** : सेंट पॉल्स पब्लिक स्कूलमध्ये ०३ रोजी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या वेळी संस्थेचे अध्यक्ष नवनीत लखोटीया , लुनकरन डागा, प्रमोद चांडक, शारदा लखोटिया ,रेखा चांडक, दीपम लखोटिया. शाळेच्या प्रा.कविता मिश्रा, शिक्षक प्रमोद वसू व शिक्षिका पूनम मोरखडे व महात्मा गांधी यांच्या वेशभूषेत प्रियांशू ढगे मंचावर उपस्थित होते कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांचे कुंमकुम तिलक करून झाली. त्यानंतर मान्यवरांनी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री तसेच माता सरस्वती यांच्या प्रतिमेचे पूजन केले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. वर्ग पहिलीच्या विद्यार्थ्यांनी माहात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या विषयी आपले मनोगत व्यक्त केले .त्यानंतर प्रवीण कुलट यांनी महात्मा गांधी यांनी लिहिलेली प्रार्थना सादर केली.

# हिवरखेड शहरात मोकाट कुत्र्यांचा उच्छाद

## नगरसेवक ऋषिकेश पंचबुद्धे यांचे मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

प्रतिनिधी ५ ऑक्टोबर



**हिवरखेड** : शहरातील विविध प्रभागांमध्ये मोकाट कुत्र्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून, नागरिकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

याबाबत नगरसेवक ऋषिकेश श्रीकृष्ण पंचबुद्धे यांनी नगरपरिषद मुख्याधिकारी यांना निवेदन दिले आहे. मोकाट कुत्र्यांचे टोळके रस्त्यावर फिरत असल्याने लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच दुचाकीस्वारांमध्ये भीतीचे वातावरण आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी मोकाट कुत्र्यांकडून नागरिकांचा पाठलाग केला जात असून, अचानक रस्त्यावर आल्याने अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

शहरातील मोकाट कुत्र्यांचे तात्काळ सर्वेक्षण करावे, नियमानुसार मोकाट कुत्र्यांचे पकडणे, निर्बीजकरण व लसीकरणाची मोहीम राबवावी, शाळा, बाजारपेठ, मुख्य रस्ते, बसस्थानक व गर्दीच्या ठिकाणी विशेष मोहीम राबवावी, नागरिकांच्या तक्रारीसाठी स्वतंत्र तक्रार व्यवस्था उपलब्ध करावी, शहरातील कचरा व खाद्यपदार्थ उघड्यावर पडणार नाहीत याची दक्षता घ्यावी आदी मागण्या केल्या आहेत. नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होण्यापूर्वी वरील मागण्यांवर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी, अन्यथा नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी लोकशाही मार्गाने आंदोलन छेडावे लागेल, असा इशारा या निवेदनातून देण्यात आला आहे.

मला सुद्धा आज मोकाट कुत्र्याने मोटरसायकल मध्ये आडवे येऊन खाली पाडले माझ्या पायाला दुखापत झाली. शहजाद खान यांनी सांगितले.

# संस्कृती संवर्धन समिती तर्फे मांडेकर परिवाराच्या गणपतीला पुरस्कार



प्रतिनिधी ५ ऑक्टोबर

**अकोला** : संस्कृती संवर्धन समिती व्दारे मांडेकर परिवाराने स्थापन केलेल्या गणपतीला पुरस्कार मिळाला. शिवाजी नगरात नवश्या गणेश नाशिक या स्वयंभू पर्यावरण पुरक, शाळूमाती गणेश मूर्ती स्थापन केली. आकर्षक सजावट करून मुर्तीचे विसर्जन

शेतातील विहिरीत केले.

याची दखल घेवून मांडेकर परिवाराला प्रशस्ती पत्र व शिल्ड देवून संवर्धन समितीने गौरव केला. कार्यक्रमाचे आयोजक प्राध्यापक नितीन बाठे संचालक ,समर्थ कोचिंग क्लासेस ,डॉ. हेडा बिजीई सोसायटी, नगरसेवक निलेश देव, श्रीराम भिरड संयोजक , महेश जोशी , ऋतिज्ञा पांडे आदि मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्काराचे वितरण केले .

# चरणगावचे ग्रामसेवक जयेश तायडे यांच्या निलंबनाची फाईल आठ दिवसांपासून सीईओंच्या टेबलवर

प्रतिनिधी ५ ऑक्टोबर



**अकोला** : चरणगाव ग्रामपंचायतीतील कथित आर्थिक गैरव्यवहाराच्या प्रकरणात ग्रामसेवक जयेश तायडे यांच्यावर निलंबनाची कारवाई प्रस्तावित असून, संबंधित निलंबनाची फाईल गेल्या आठ दिवसांपासून जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या टेबलवर प्रलंबित असल्याची माहिती आहे.

चरणगाव ग्रामपंचायतीतील १४ लाख ६५ हजार ५०० रुपयांच्या कथित आर्थिक अपहाराच्या प्रकरणात सरपंच मेघा देशमुख आणि ग्रामपंचायत सचिव जयेश तायडे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाल्याचे यापूर्वी समोर आले होते. या प्रकरणात भारतीय न्याय संहितेतील विविध कलमांनुसार कारवाई करण्यात आली आहे.

या पार्श्वभूमीवर ग्रामसेवक जयेश तायडे यांच्यावर विभागीय पातळीवर निलंबनाची कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे. मात्र, निलंबनाच्या फाईलवर CEO स्तरावर अद्याप अंतिम निर्णय झालेला नसल्याने कारवाई कधी होणार, याकडे लक्ष लागले आहे.

दरम्यान, संबंधित प्रकरणात आर्थिक व्यवहार, कागदपत्रे, निधीचा वापर तसेच निर्णय प्रक्रियेची चौकशी महत्त्वाची ठरणार आहे. त्यामुळे गुन्हा दाखल झाल्यानंतरही प्रशासकीय कारवाईचा निर्णय आठ दिवसांपासून प्रलंबित का आहे? फाईलवर अंतिम निर्णय घेण्यास विलंबाचे कारण काय? असे प्रश्न उपस्थित होत आहेत

# तुटलेल्या विद्युत तारेला स्पर्श; शेतकऱ्याची म्हैस दगावली!

**पातूर** : पातूर परिसरातील सिंगर नाला येथे विद्युत तार तुटून पडल्याने त्यातून वाहणाऱ्या वीजप्रवाहाचा धक्का लागून एका गरीब शेतकऱ्याच्या म्हशीचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे शेतकरी कुटुंबावर आर्थिक संकट कोसळले असून, तक्रार करूनही चार दिवस उलटून पंचनामा करण्यात आला नसल्याचा आरोप संबंधित शेतकऱ्याने केला आहे. पातूर येथील मुजावरपुरा परिसरातील शेतकरी शेख कालू शेख रसूल यांची म्हैस सिंगर नाला परिसरात चारत असताना तुटलेल्या विद्युत तारेला स्पर्श झाला. तारेला विद्युत प्रवाह सुरू असल्याने विजेचा जोरदार धक्का लागून म्हैस जागीच मृत्युमुखी पडल्याचे शेतकऱ्याचे म्हणणे आहे. या घटनेनंतर शेख कालू शेख रसूल यांनी वीज वितरण कंपनीकडे तक्रार करून संबंधित घटनेची माहिती दिली. मात्र, चार दिवस उलटूनही घटनास्थळी पंचनामा करण्यासाठी अधिकारी आले नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. त्यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्याला शासनाकडून अथवा संबंधित यंत्रणेकडून मिळणाऱ्या संभाव्य मदतीपासून वंचित राहण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

म्हैस हीच या गरीब शेतकरी कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन असल्याचे सांगण्यात येत आहे. म्हशीच्या मृत्यूमुळे कुटुंबाच्या उत्पन्नाचा मोठा आधारच हिरावला गेला असून, आता उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे.

# दुष्काळ व शेती प्रश्नांवर विधान भवनात करणार ठिय्या आंदोलन

प्रतिनिधी ५ ऑक्टोबर



**मूर्तिजापूर** : दुष्काळ प्रश्नांवर राज्यकर्ते गांभीर्याने विचार न करता शेतकऱ्यांना भरीव आर्थिक मदतीची घोषणा करीत

नाहीत. त्यामुळे येत्या ७डिसेंबर २०२६ रोजी नागपूर अधिवेशनात विधान भवन परिसरात ठिय्या आंदोलन करण्याची घोषणा किसान ब्रिगेडचे संस्थापक प्रकाश पोहरे यांनी मूर्तिजापूर येथे दुष्काळ परिषदेत

उद्घाटन भाषणात केली. या आंदोलनात लाखोंच्या संख्येने उपस्थित राहून सरकारला झुकवून घसघशीत आर्थिक मदत मिळून घेऊ याकरता सर्वांनी शेतकऱ्यांची शक्ती दाखवण्यासाठी तयारीत राहावं असे आवाहनही त्यांनी केले.शेतकऱ्याला उत्पादन खर्चा पेक्षा कमी भाव मिळणार असेल तर तो कर्जबाजारीच राहणार असे वक्तव्य करून शेतकरी पुन्हा कर्जबाजारी होऊ न देणारी शेतीची अर्थव्यवस्था हवी असे मत त्यांनी व्यक्त केले. मुर्तीजापुर येथे जनमंच, प्रगती शेतकरी मंडळाच्या वतीने आयोजन केले होते.

शेतकरी जागरमंच संस्थापक प्रशांत गावंडे यांनी पेट्रोल व डिझेलच्या किमतीतून प्रति लिटर मागे एक रुपया दुष्काळ निधीसाठी जमा करण्यात येतो त्याची हजारो कोटी रुपये शासनाजवळ जमा असूनही सरकार कडून कुठलीही मदतीची घोषणा केल्या जात नाही. यावरून सरकार जवळ विचारांचा दुष्काळ असल्याचे जाणवते असे मत व्यक्त केले.शेतकरी नेते गजानन अमदाबादकर यांचेही अनमोल,परिस्थितीजन्य मार्गदर्शन लाभले. या दुष्काळ परिषदेचे आयोजना मागची भूमिका, शेतकऱ्यांच्या समस्या, त्याची आजची अवस्था आयोजक राजूभाऊ वानखडे यांनी प्रास्ताविकातून मांडली. संचालन जनमंचचे प्रा. सुधाकर गौरखेडे यांनी व आंतरभारतीचे प्रमोद राजनदेकर यांनी आभार मानले. ही परिषद यशस्वीतेसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष कैलास साबळे, सेवकराम लहाने, माधवराव काळे, प्रफुल्ल मालधूरे, मुन्ना नाईकनवरे, नंदकिशोर बबानीया, योगेश सोळंके, जगदीश जोगळे, अनिल देवगिरकर ,श्रीकांत वानखडे संजय वैद्य, बबनराव वानखेडे,गोपाल तायडे,अरुण बोंडे यांनी परिश्रम घेतले.

## स्मार्ट मीटर नको म्हणणाऱ्यांना सक्ती

**हिवरखेड :** स्मार्ट मीटरला विरोध करणाऱ्या ग्राहकांसाठी महावितरण कंपनीने आता नवी शक्कल लढविली असल्याचे उघड झाले आहे. ज्यांना स्मार्ट मीटर पाहिजे नाही, अशा ग्राहकांवर थेट सक्ती करण्याऐवजी आता ज्यांचे जुने मीटर आहे, त्यांचे नाव रीडिंगच्या यादीतूनच कपात केले जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. रीडिंग घेणारे कर्मचारी येत नाहीत, बिल येत नाही आणि शेवटी मजबुरीने ग्राहकाला स्मार्ट मीटर घ्यावेच लागेल, अशी ही महावितरणची नवी खेळी असल्याचा आरोप ग्राहकांकडून होत आहे.

सक्तीने स्मार्ट मीटर बसविण्याच्या या पद्धतीला हिवरखेड परिसरातील ग्राहकांकडून तीव्र विरोध होत असल्याचे चित्र आहे.

# मुर्तिजापूरकरांवर भीषण पाणी संकट!

अनवर खान ५ ऑक्टोबर

**मुर्तिजापूर :** तालुक्यात यंदा पावसाने पाठ फिरवल्याने दुष्काळाची छाया अधिक गडद होत असून, त्याचा थेट परिणाम शहराच्या पाणीपुरवठ्यावर होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मुर्तीजापूर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या प्रमुख जलस्रोतांमध्ये सध्या केवळ १८ टक्के पाणीसाठा शिल्लक असल्याने आगामी काळात शहरासमोर भीषण पाणीटंचाईचे संकट उभे ठाकण्याची चिन्हे आहेत. उपलब्ध पाणीसाठा किती दिवस पुरणार आणि तो संपल्यानंतर हजारो नागरिकांची तहान कशी भागविणार, हा प्रश्न प्रशासनासमोर मोठे आव्हान बनला आहे.

यंदाच्या पावसाळ्यात अपेक्षित प्रमाणात पाऊस न झाल्यामुळे जलसाठ्यांमध्ये समाधानकारक वाढ झालेली नाही. त्यामुळे वर्षभराच्या पाणीपुरवठ्याचे नियोजन करताना प्रशासनाला मोठ्या अडचणींचा सामना करावा लागणार आहे. सध्या उपलब्ध असलेला साठा नागरिकांसाठी महत्त्वाचा आधार असला तरी त्याचा वापर काटकसरीने न केल्यास भविष्यात परिस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे.

**साठा संपण्यापूर्वी नियोजनाची गरज**

पाणीटंचाई निर्माण झाल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा सध्यापासूनच पर्यायी जलस्रोतांचा शोध घेणे आणि आपत्कालीन पाणीपुरवठ्याचा कृती आराखडा तयार करणे आवश्यक आहे. शहरातील विहिरी, बोअरवेल, उपलब्ध जलस्रोत, टँकरद्वारे पाणीपुरवठा तसेच इतर पर्यायी व्यवस्था यांचा प्रशासनाने आढावा घेणे गरजेचे आहे.

विशेष म्हणजे शहराची वाढती लोकसंख्या आणि दररोजची वाढणारी पाण्याची गरज लक्षात घेता उपलब्ध २० टक्के साठ्याचे काटेकोर नियोजन करणे आवश्यक आहे. साठा किती दिवस पुरू शकतो, दररोज किती पाणी वापरले जाते आणि भविष्यातील गरज किती आहे, याचा शास्त्रशुद्ध आढावा घेऊन पुढील नियोजन करण्याची आवश्यकता आहे.



### मानवाबरोबर पशुधनाचाही पाणीप्रश्न गंभीर

पाणीटंचाईचा परिणाम केवळ शहरातील नागरिकांवर होणार नाही, तर ग्रामीण भागातील पशुधनावरही त्याचे गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे. उपलब्ध आकडेवारीनुसार मुर्तीजापूर तालुक्यात तब्बल ३९ हजार ३९३ पशुधन आहे. यामध्ये गायी, म्हशी, वासरे, शेळ्या, मेंढ्या तसेच इतर पशुधनाचा समावेश आहे. ग्रामीण भागातील अनेक शेतकऱ्यांचे पशुधन हे त्यांच्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचे महत्त्वाचे साधन आहे. पाण्याची उपलब्धता कमी झाल्यास जनावरांना पुरेसे पाणी देणे कठीण होऊ शकते. परिणामी जनावरांच्या आरोग्यावर, दूध उत्पादनावर तसेच शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्पन्नावर परिणाम होण्याची शक्यता आहे.

### शहरासमोर आगामी काळात मोठे आव्हान

सध्या उपलब्ध असलेला १८ टक्के पाणीसाठा हा मुर्तीजापूर शहरासाठी मोठा आधार असला तरी तो कायमस्वरूपी पुरेसा राहणार नाही. पावसाची परिस्थिती सुधारली नाही आणि नवीन जलस्रोतांमध्ये पाण्याची भर पडली नाही, तर साठा संपल्यानंतर शहराच्या पाणीपुरवठ्याची मोठी समस्या निर्माण होऊ शकते. अशा परिस्थितीत नागरिकांना टँकरच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागू शकते. मात्र शहराची लोकसंख्या आणि पाण्याची गरज लक्षात घेता टँकर व्यवस्था कितपत पुरेशी ठरेल, हा देखील महत्त्वाचा प्रश्न आहे. त्यामुळे टंचाई सुरू झाल्यानंतर धावपळ करण्याऐवजी साठा संपण्यापूर्वीच पर्यायी व्यवस्था निश्चित करणे आवश्यक आहे.

### गावनिहाय पाणी ताळेबंद तयार करणे आवश्यक

सध्याच्या परिस्थितीत केवळ टँकर मंजूर करणे हा कायमस्वरूपी उपाय ठरू शकत नाही. शहरासह ग्रामीण भागातील उपलब्ध पाण्याचा गावनिहाय पाणी ताळेबंद तयार करणे अत्यंत आवश्यक आहे. प्रत्येक गावाची लोकसंख्या, पशुधन संख्या, उपलब्ध जलस्रोत, दररोजची पाण्याची गरज आणि भविष्यातील संभाव्य टंचाई यांचा स्वतंत्रपणे विचार करून नियोजन करण्याची गरज आहे. पिण्याचे पाणी, पशुधनासाठी आवश्यक पाणी आणि इतर अत्यावश्यक गरजा यांचा समतोल राखण्यासाठी प्रशासनाने आतापासूनच नियोजन करणे गरजेचे आहे. पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी जनजागृती करण्याबरोबरच उपलब्ध साठ्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहनही नागरिकांना करणे आवश्यक आहे.

### महान धरणातील साठा संपल्यानंतर तहान भागणार कशी

### पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे नियोजन गरजेचे

कमी पाऊस, घटता जलसाठा आणि वाढती पाण्याची गरज या तिन्ही बाबी एकत्र आल्याने मुर्तीजापूरकरांसमोर आगामी काळात पाणीटंचाईचे मोठे संकट उभे राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासनाने शहराच्या पाणीपुरवठ्याचा तातडीने आढावा घेऊन तात्कालिक तसेच दीर्घकालीन पाणी नियोजन करणे आवश्यक आहे.

जलसाठा संपण्याची वेळ येण्यापूर्वी पर्यायी स्रोत निश्चित करणे, आवश्यक त्या ठिकाणी विहिरी व बोअरवेलची पाहणी करणे, टँकर व्यवस्थेचे नियोजन करणे, पाणीगळती रोखणे आणि नागरिकांमध्ये पाणी बचतीबाबत जनजागृती करणे या उपाययोजना तातडीने करण्याची गरज आहे. पाणीसाठा आहे; उद्या तो शून्यावर जाण्यापूर्वी प्रशासनाने जागे होणे हीच काळाची गरज आहे. पाण्याचा वापर काटकसरीने केल्यास भविष्यातील संकटाशी सामना करता येईल.

---

## जिल्ह्यात नवीन विहीर, कूपनलिका खोदण्यावर आणि व्यावसायिक पाणी उपशावर बंदी

### जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

प्रतिनिधी ५ ऑक्टोबर

**अकोला :** जिल्ह्यात यंदा कमी पर्जन्यमान झाल्यामुळे भूजल पातळीत मोठी घट झाली आहे. आगामी उन्हाळ्यात तीव्र पाणीटंचाई भासू नये आणि जिल्ह्यातील सार्वजनिक पिण्याच्या पाण्याचे स्रोत सुरक्षित राहावेत, यासाठी जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आपत्ती व्यवस्थापन अधिनियमांतर्गत संपूर्ण जिल्ह्यात प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. हे आदेश ३ ऑक्टोबर २०२६ पासून पुढील आदेशापर्यंत लागू आहेत.

**नवीन विहिरी व बोअरवेल खोदण्यास बंदी**

जिल्ह्यातील सर्व शहरी आणि ग्रामीण भागांत सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोतापासून ५०० मीटरच्या परिघात कोणत्याही खाजगी किंवा व्यावसायिक वापरासाठी नवीन विहीर अथवा कूपनलिका (बोअरवेल) खोदण्यास पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. सक्षम प्राधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय उत्खनन केल्यास मशीन व साहित्य जप्त करून कायदेशीर कारवाई केली

### उल्लंघन केल्यास कडक कारवाई

या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती, संस्था किंवा कंत्राटदारांविरुद्ध 'भारतीय न्याय संहिता, २०२३' आणि 'महाराष्ट्र भूजल अधिनियम, २००९' नुसार कडक फौजदारी गुन्हे दाखल केले जातील व त्यांचे पंप, पाईपलाईन किंवा बोअरवेल मशीन जप्त करण्यात येतील. या आदेशाची काटेकोर अंमलबजावणी होण्यासाठी सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, बीडीओ, पोलीस आणि नगरपालिका, महानगरपालिका प्रशासनाने कार्यवाही करण्याचे आदेश आहेत.

### पाणी उपसा बंदी

जिल्ह्यातील लहान, मध्यम व मोठे शासकीय जलप्रकल्प, नद्या, नाले आणि बंधाऱ्यांमधून उद्योग किंवा व्यावसायिक कारणांसाठी पाणी उपसा करण्यास तात्काळ बंदी घालण्यात आली आहे. उपलब्ध पाणी साठा केवळ पिण्यासाठी आणि टँकर भरण्यासाठी आरक्षित ठेवण्यात आला आहे.

## शाळेच्या परिसरात आढळलेल्या सापाला सर्पमित्राने दिले जीवदान



**आलेगाव :** आलेगाव येथील प्रभाप्रकाश इंग्लिश स्कूलच्या परिसरात आज एक मोठा साप आढळून आल्याने शाळेत काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. याची माहिती शाळेचे अध्यक्ष अक्षय जैन यांनी सर्पमित्र सय्यद अयाज़ सय्यद अयूब यांना फोनद्वारे दिली.

माहिती मिळताच सय्यद अयाज़ सय्यद अयूब यांनी तातडीने शाळेच्या परिसरात पोहोचून सापाला सुरक्षितपणे पकडले. त्यानंतर सापाला जंगल परिसरात सुरक्षितपणे सोडून देण्यात आले. त्यांच्या या कार्यामुळे शाळा प्रशासनासह उपस्थितांनी त्यांचे कौतुक केले.

## शेतकऱ्यांना खासगी डॉक्टरांकडे मोफत ओपीडीची जावेद जकरिया यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

प्रतिनिधी ५ ऑक्टोबर

**अकोला :** नैसर्गिक संकटामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकरी व त्यांच्या कुटुंबीयांना आरोग्य उपचारांमध्ये दिलासा मिळावा, यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवारचे प्रदेश संघटक सचिव जावेद जकरिया यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांना ई-मेलद्वारे निवेदन पाठवून विशेष सवलती देण्याची मागणी केली आहे.

शेतकऱ्यांचे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून त्यांच्यावर आर्थिक संकट ओढवले आहे. अशा परिस्थितीत खासगी डॉक्टरांकडील OPD शुल्क, तपासण्या आणि औषधांचा



खर्चही शेतकरी कुटुंबांसाठी मोठा आर्थिक भार ठरत असल्याचे जकरिया यांनी निवेदनात नमूद केले आहे.

जकरिया यांनी मागणी केली आहे की, पात्र शेतकरी व त्यांच्या कुटुंबीयांसाठी खासगी डॉक्टर आणि खासगी रुग्णालयांमध्ये OPD तपासणी शुल्क माफ किंवा अत्यंत नाममात्र करण्यात यावे. ही विशेष आरोग्य सवलत ३० जून २०२७ पर्यंत लागू ठेवावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. तसेच राज्यातील मेडिकल दुकानदार, फार्मसी व औषध विक्रेत्यांनी शेतकरी कुटुंबांना आवश्यक औषधांवर २० ते २५ टक्के विशेष सवलत द्यावी, यासाठी शासनाने राज्यव्यापी आवाहन करावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

याशिवाय कपडे, किराणा, शिक्षण, वाहतूक, दुरुस्ती, सेवा आणि इतर व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकांनीही आपल्या परीने शेतकरी व त्यांच्या कुटुंबीयांना विशेष सवलत देऊन सहकार्य करावे, असे आवाहन शासनाने करावे, अशी मागणी जकरिया यांनी केली आहे.

---

## अकोला रेल्वे पोलिस स्टेशनमध्ये शिरला 6 फुटी साप; सर्पमित्राने केले रेस्क्यू

प्रतिनिधी ५ ऑक्टोबर



**अकोला :** अकोला रेल्वे पोलिस स्टेशन मध्ये रविवारी अचानक साप आढळून आल्याने काही काळ घबराट पसरली. परंतु पोलीस कर्मचाऱ्यांचे प्रसंगावधान आणि सर्पमित्राच्या तत्परतेमुळे या सापाला सुरक्षितपणे नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले.

सकाळी नेहमीप्रमाणे कामकाज सुरू असताना पोलीस कॉन्स्टेबल जितेंद्र देशमुख यांना सीसीटीएनएस कक्षात एक साप दिसला. त्यांनी याची माहिती तात्काळ पोलीस निरीक्षक अमोल दोंड यांना दिली. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून त्यांच्या सूचनेनुसार सीसीटीएनएस कक्ष त्वरित खाली करण्यात आला.यानंतर महिला पोलीस कॉन्स्टेबल उज्ज्वला यांनी सर्पमित्राशी संपर्क साधला. अकोला जिल्हा सर्पमित्र 'MH30' टीमचे सर्पमित्र सूरज इंगळे यांनी तातडीने जीआरपी गाठले. पाहणी केली असता हा साप बिनविषारी 'धामण' जातीचा असून त्याची लांबी सुमारे ६ फूट असल्याचे स्पष्ट झाले. सर्पमित्र सूरज इंगळे यांनी अत्यंत कौशल्याने धामण सापाला पकडले आणि त्याला त्याच्या नैसर्गिक अधिवासात सुखरूप मुक्त केले.

## अकोली मार्गावर भीषण अपघातात महिलेचा मृत्यू

**बेलखेड :** हिवरखेड हिवरखेड पोलीस स्टेशन हद्दीत येत असलेल्या बेलखेड - अकोली मार्गावर ४ ऑक्टोबर रोजी दुपारी भीषण अपघात झाला. मिळालेल्या माहितीनुसार एका ऑटो रिक्षाला MH-30 - 1867 या महिंद्रा सुप्रो कंपनीच्या भरधाव वाहनाने जोरदार धडक दिली. धडकेत रिक्षामधील एक महिला खाली पडली आणि भरधाव वाहन तिच्या अंगावरून गेल्याने ती गंभीर जखमी झाल्याचे सांगण्यात येत आहे, जखमी महिलेला तात्काळ ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले असता डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. या घटनेनंतर फिर्यादी संतोष गोकुळदास छागाणी, रा. वाडी आदमपूर यांनी तात्काळ हिवरखेड पोलीस स्टेशन गाठून आरोपी वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

## श्रध्दा मोकाशी यांना निसर्गोपचार गौरव पुरस्कार

प्रतिनिधी ५ ऑक्टोबर

**अकोला :** येथील आळशी प्लॉटमधील सौ. श्रद्धा श्रीधर मोकाशी यांना निसर्गोपचार गौरव पुरस्कार मिळाला.

राज्यस्तरीययोग स्पर्धा परीक्षक परीक्षा प्राविण्य घेवून उतीर्ण झाल्या आहेत. सौ. श्रध्दा मोकाशी अनेक शाळा, कॉलेजेस, संस्था तसेच इतर ठिकाणी जाऊन योग शिबीरे घेतात. गर्भवती महिलांना गर्भसंस्कार आणि नैसर्गिक, सुद्दढ प्रसुती करीता योग पण शिकवतात. आळशी प्लॉट्स येथील वर्गात निशुल्क योग आणि बालसंस्कार शिबिर सातत्याने घेतात. सौ. श्रध्दा मोकाशी यांच्या सेवाकार्याची दखल घेत आयुष मेडिकल असोसिएशन तर्फे 22 जून 2025 ला संभाजीनगर येथे योगरत्न पुरस्कार देवुन गौरवण्यात आले होते. या वर्षी आयुष मेडिकल असोसिएशन तर्फे 4 ऑक्टोबरला निसर्गोपचार गौरव सन्मान मान्यवरांच्या हस्ते देण्यात आला. सौ. श्रध्दाताई विश्वमांगल्य सभा, धर्मसंस्कृती शिक्षा विभागात अखिल भारतीय प्रशिक्षण प्रमुख आणि अखिल भारतीय यात्रा प्रभारी म्हणून दायित्व सांभाळत आहेत. जानेवारी 2026 पासून काशी येथे दर महिन्यात 20 दिवस निवासी चालणाऱ्या मातृशिक्षा केंद्राची जबाबदारी सांभाळत आहेत.



## एमराल्ड हाइट्स स्कूलच्या विद्यार्थ्यांची विभागीय स्तरावर निवड



प्रतिनिधी ५ ऑक्टोबर

**अकोला :** अकोला जिल्हा क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय शालेय सपक टकरा स्पर्धेत एमराल्ड हाइट्स स्कूल, गीता नगर शाखेच्या १४ वर्षांखालील मुलांच्या व मुलींच्या संघांनी उल्लेखनीय कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला. या दमदार यशामुळे दोन्ही संघांची विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

मुलांच्या संघात सोहम घोडके, जयान खान, अंश लिधोरकर, कौस्तुभ सावले व भावेश भालतिलक, तर मुलींच्या संघात सेजल अवदूत, आस्था मात्रे, श्रावणी वाकोडे, पृथा गावंडे व जानवी निखाडे यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करीत शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील लौकिकात मानाचा तुरा रोवला. त्यांना क्रीडा शिक्षक आशुतोष दुबे यांचे मार्गदर्शन लाभले.

---

## चाऱ्याची जिल्ह्याबाहेर वाहतूक व विक्री करण्यास बंदी, जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

प्रतिनिधी ५ ऑक्टोबर

**अकोला :** जिल्ह्यामध्ये यंदा कमी पर्जन्यमान झाल्यामुळे गंभीर दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. खरीप हंगामातील पिकांचे मोठे नुकसान झाल्यामुळे जिल्ह्यात पशुधनासाठी आवश्यक असणाऱ्या हिरव्या व सुक्या चाऱ्याची तीव्र टंचाई भासण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर, स्थानिक शेतकरी आणि पशुपालकांच्या जनावरांचा चारा साठा सुरक्षित ठेवण्यासाठी जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी अकोला जिल्ह्यातून चाऱ्याची जिल्ह्याबाहेर वाहतूक व विक्री करण्यास तात्काळ पूर्ण बंदी घालण्याचे आदेश दिले आहेत.

### जिल्ह्याबाहेर चारा नेण्यास मनाई

आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ आणि महाराष्ट्र वैरण (निर्यात नियंत्रक) आदेश २००१ मधील तरतुदींनुसार हा निर्णय घेण्यात आला आहे. अकोला जिल्ह्याच्या भौगोलिक सीमेतून कोणत्याही प्रकारचा हिरवा अथवा सुका चारा (जसे की कडबा, कुटी, पेंढा, ऊसाचे पाचट व पाने, मका इत्यादी) सक्षम प्राधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीशिवाय जिल्ह्याबाहेर निर्यात करता येणार नाही. हा आदेश ३ ऑक्टोबर २०२६ पासून पुढील आदेशापर्यंत संपूर्ण अकोला जिल्हा कार्यक्षेत्रात लागू राहील.

### नियमांचे उल्लंघन केल्यास कडक कारवाई

जिल्ह्यांतर्गत (एका तालुक्यातून दुसऱ्या तालुक्यात) शेतकऱ्यांना स्वतःच्या वापरासाठी चारा वाहतुकीला परवानगी असेल, मात्र त्यात कोणताही व्यावसायिक गैरप्रकार आढळल्यास कारवाई केली जाईल. केवळ शासकीय चारा छावण्या किंवा प्रशासनाने अधिकृत मंजुरी दिलेल्या वाहतुकीलाच यातून सूट असेल.चाऱ्याची बेकायदेशीर वाहतूक रोखण्यासाठी जिल्हा पोलीस प्रशासन आणि प्रादेशिक परिवहन विभागातर्फे जिल्ह्याच्या सीमांवर विशेष तपासणी नाके सुरू करण्यात येत आहेत. या आदेशाचे उल्लंघन करून अवैध वाहतूक किंवा साठेबाजी करणाऱ्यांविरुद्ध आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ आणि भारतीय न्याय संहिता २०२३ नुसार कडक फौजदारी गुन्हे दाखल केले जातील आणि जप्त केलेला चारा स्थानिक शासकीय संस्था किंवा गोशाळांना दिला जाईल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

## वन वे तून उड्डाण पुलावर प्रवेश

**अकोला :** शहरात टॉवर चौक व टीव्हीएस चौक या ठिकाणावरून उड्डाण पुलावर प्रवेश करणे निषिद्ध असतानाही अनेक वाहनधारक नियमांना फाटा देत यावरून सर्रास प्रवेश करीत आहेत. यामुळे एखाद्यावेळी अपघात घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. पूर्वी उड्डाण पुलावर वाहतूक पोलिस राहत असल्याने वाहनधारक नियमांचे पालन करीत असत आता त्या ठिकाणी वाहतूक पोलिस राहत नसल्याने सर्रास वनवेतून वाहनधारक वाहने टाकत आहेत. यात दुचाकीधारकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. विशेष म्हणजे या वन वेतून उलटल्या दिशेने वाहनधारकांनी प्रवास करून नये यासाठी 'टायर किलर्स' लावण्यात आले होते. त्यावरही वाहनधारकांनी पर्याय शोधला आहे.

## नाव दुरुस्तीबाबत जाहीर सूचना

मी, **शेख तनवीर शेख अब्बास,** रा. सिद्धार्थ नगर, रेल्वे स्टेशनजवळ, मूर्तीजापूर, जि. अकोला – ४४४१०७, याद्वारे जाहीर करतो की, माझे पूर्वीचे नाव **शेख तनवीर शेख अब्बास** असे नमूद होते; मात्र माझे योग्य व पूर्ण नाव **तन्वीर अब्बास शेख** असे आहे. नावातील दुरुस्ती करण्याचा उद्देश माझ्या सर्व शासकीय, वैयक्तिक व इतर अधिकृत नोंदींमध्ये एकसमान व अचूक नाव नोंदविणे हा आहे.

यापुढे माझे नाव सर्व शासकीय, वैयक्तिक व इतर सर्व कागदपत्रांमध्ये **तन्वीर अब्बास शेख** असेच नमूद करण्यात यावे आणि भविष्यातील सर्व कागदपत्रे, अर्ज, नोंदी व व्यवहारांसाठीही **तन्वीर अब्बास शेख** हेच नाव वापरण्यात यावे. म्हणून या वर्तमानपत्राच्या माध्यमातून जाहीर करत आहोत

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
सोमवार, दि. ५ ऑक्टोबर २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# कृषीपंपांना 'कॅपेसिटर' बंधनकारक

प्रतिनिधी ५ ऑक्टोबर

**यवतमाळ :** शेतीला अखंड आणि सुरळीत वीजपुरवठा मिळावा, या उद्देशाने महावितरणने आता कंबर कसली आहे. दुष्काळाच्या सावटात पिकांना वेळेवर पाणी मिळण्यासाठी महावितरण कटिबद्ध असून, त्यासाठी आता कृषी पंपांना 'कॅपेसिटर' लावणे अत्यंत आवश्यक करण्यात आले आहे. वीज यंत्रणेवरील ताण कमी करण्यासाठी आणि रोहित्रे जळण्यापासून वाचवण्यासाठी शेतकऱ्यांनी या मोहिमेत सहकार्य करावे, असे कळकळीचे आवाहन महावितरणचे मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी केले आहे.

या पार्श्वभूमीवर महावितरणने संपूर्ण परिमंडळात एक विशेष जनजागृती मोहीम उघडली असून, क्षेत्रीय अभियंत्यांना प्रत्यक्ष बांधावर जाऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याचे थेट निर्देश देण्यात आले आहेत.

## महावितरणची शेतकऱ्यांसाठी 'स्पेशल मोहीम'

### वीजप्रवाह ३० टक्क्यांनी नियंत्रणात

■ कॅपेसिटर पंपाला लागणारी 'रिॲक्टिव्ह पॉवर' थेट पुरवतो, ज्यामुळे मुख्य लाईनवरील ताण तात्काळ कमी होतो. ट्रान्सफॉर्मर जळणे बंद: लाईनवरील ताण घटल्याने रोहित्र जळणे आणि विजेच्या तारा तुटण्याच्या प्रकारांना पूर्णपणे आळा बसतो.

### मोटारीला पूर्ण व्होल्टेज

■ शेतकऱ्यांना योग्य दाबाने वीज मिळते, ज्यामुळे कृषीपंप जळत नाही आणि त्याची क्षमताही वाढते. अवघ्या ३०० ते ५०० रुपयांत हजारोंचे संरक्षण! बाजारात एल अँड टी, कॅपको, हॅवेल्स यांसारख्या विश्वासू कंपन्यांचे कॅपेसिटर सहज उपलब्ध आहेत. अवघ्या ३०० ते ५०० रुपयांचा फुटकळ खर्च करून शेतकरी बांधव आपली हजारो रुपयांची मोटार जळण्यापासून सुरक्षित ठेवू शकतात.

**काय आहे 'कॅपेसिटर'ची जादू?** शेतातील कृषीपंपांमध्ये वापरात असलेली 'इंडक्शन मोटर' सुरू होताना विजेच्या तारांवरून तब्बल ३० टक्के जास्त अतिरिक्त वीज खेचते. यामुळे वीजवाहिन्यांवर प्रचंड ताण येऊन रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) ओव्हरलोड होतात आणि जळून खाक होतात.

ऐन पाण्याच्या गरजेच्या वेळी रोहित्र जळाल्यास शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होते. यावर 'कॅपेसिटर' हा एक अत्यंत सोपा उपाय आहे.

### 'ऑटोस्विच' काढून टाका

■ वीज येताच पंप आपोआप सुरू व्हावा यासाठी अनेक शेतकऱ्यांनी 'ऑटोस्विच' बसवले आहेत. मात्र, वीज आल्यावर एकाच वेळी हजारो पंप सुरू झाल्यामुळे रोहित्रावर अचानक प्रचंड भार पडतो आणि रोहित्र तात्काळ जळते. ही गंभीर समस्या टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी आपल्या पंपाचे ऑटोस्विच तात्काळ काढून टाकावेत आणि त्याऐवजी योग्य क्षमतेचा कॅपेसिटर बसवावा, असे आवाहन महावितरण प्रशासनाने केले आहे.

## राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेसाठी सोनबर्डी येथील तीन खेळाडूंची निवड

प्रतिनिधी ५ ऑक्टोबर

**पांढरकवडा :** मूर्तीजापूर (जि. अकोला) येथे २ ऑक्टोबर ते ४ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत आयोजित ५३ व्या राज्यस्तरीय (१९ वर्षांखालील) कबड्डी स्पर्धेकरिता यवतमाळ जिल्ह्यातील जय मल्हार क्रीडा व व्यायाम प्रसारक मंडळ, सोनबर्डी येथील तीन खेळाडूंची निवड करण्यात आली आहे.

निवड झालेल्या खेळाडूंमध्ये कु. युतिका सतीश गडे, कु. मानसी संतोष करपते या दोन महिला खेळाडू आणि वृषभ सुभाष शेळके या पुरुष खेळाडूचा समावेश आहे. या तीनही खेळाडूंनी यवतमाळ जिल्हा संघात स्थान मिळवून मंडळाचा व परिसराचा गौरव वाढवला आहे. सोनबर्डी येथील स्थानिक खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाल्याचे समजताच गावात आणि क्रीडा वर्तुळात आनंदाचे व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या यशाबद्दल मंडळाचे अध्यक्ष सुधाकर शेळके, सचिव कवडुजी खाडे, प्रमोद पंचभाई, मंगेश गौरकार, संदीप निपुगे, काळे, रवी काळे, प्रमोद गाडगे, सुधाकर गाउत्रे, बंडू कुडमथे, गजानन पावडे, सुभाष शेळके, विकास गाउत्रे, केशव शेळके आदींनी निवड झालेल्या खेळाडूंचे मनापासून अभिनंदन केले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# रेती अन् मुरुमाची विनापरवाना वाहतूक; दोन ट्रॅक्टर जप्त



## नेर भागात एलसीबीची कारवाई

प्रतिनिधी ५ ऑक्टोबर

**यवतमाळ :** जिल्ह्यातील अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीविरुद्ध स्थानिक गुन्हे शाखेने (LCB) कारवाईचा बडगा उचलला आहे. नेर पोलीस ठाण्याच्या हद्दीत ३ ऑक्टोबर रोजी केलेल्या दोन वेगवेगळ्या स्वतंत्र कारवायांमध्ये अवैध रेती व मुरुमाची वाहतूक करणारे दोन ट्रॅक्टर-ट्रॉली आणि गौण खनिजासह एकूण १३ लाख ६२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पथक नेर परिसरात पेट्रोलिंग करत असताना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली.

**पहिली कारवाई :** नेर ते कोहळा रोडवर विनानंबरच्या निळ्या रंगाच्या पॉवरट्रॅक ट्रॅक्टर व ट्रॉलीला थांबवून चौकशी करण्यात आली. चालक राजू किसनराव मडावी (वय ४१, रा. अशोकनगर, नेर) याच्याकडे १ ब्रास पिवळी रेती आढळून आली. वाहतुकीचा परवाना नसल्याने ५ लाखांचा ट्रॅक्टर, १ लाखाची ट्रॉली आणि ८ हजारांची रेती असा एकूण ६ लाख ८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. **दुसरी कारवाई :** दारव्हा रोडवरील कृषी उत्पन्न बाजार समितीसमोर निळ्या रंगाचा सोनालिका ट्रॅक्टर (MH-29-CJ-9664 क्रमांकाची ट्रॉली) अडवण्यात आला. चालक प्रदीप गोविंदराव जाधवा (वय ३२, रा. पेणटोळा, ता. नेर) याच्याकडे १ ब्रास मुरुम वाहतुकीचे कोणतेही कागदपत्र आढळले नाही. पोलिसांनी ६ लाखांचा ट्रॅक्टर, १.५ लाखाची ट्रॉली आणि ४ हजारांचा मुरुम असा ७ लाख ५४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

याप्रकरणी दोन्ही आरोपींविरुद्ध भारतीय न्यायसंहिता (BNS) २०२३ चे कलम ३०३(२) आणि महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम ४८(७)(८) अन्वये नेर पोलीस ठाण्यात गुन्हे नोंदवण्यात आले आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अप्पर पोलीस अधीक्षक अशोक थोरात एलसीबी प्रमुख सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली कुणाल मुंडोकार, सचिन मलाये, पवन हवले व चालक अमित कुमार यांनी पार पाडली.



■ **यवतमाळ :** जिल्ह्यात पावसाने दडी मारली आहे. त्यामुळे सोयाबीन पिक पुर्ण वाळले असून, शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. शेतीला लागलेला खर्चही निघणे कठीण झाले आहे. शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. शासनाने दुष्काळ जाहीर केला. परंतु अजुन मदत मिळाली नाही. त्यामुळे शेतकरी चिंतेत सापडला आहे.

# मतदार नोंदणीसाठी पुन्हा विशेष शिबिर

## मतदार यादीत नाव नोंदविण्याची पुन्हा संधी : १०, ११ ऑक्टोबरला सर्व मतदान केंद्रांवर विशेष शिबिरे

प्रतिनिधी ५ ऑक्टोबर

**यवतमाळ :** भारत निवडणूक आयोगाने विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाच्या वेळापत्रकात सुधारणा केल्याने जिल्ह्यातील पात्र नागरिकांना मतदार यादीत नाव नोंदविण्यासाठी पुन्हा एकदा संधी उपलब्ध झाली आहे. जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघांतील मतदान केंद्रांवर १० आणि ११ ऑक्टोबर रोजी विशेष मतदार नोंदणी शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे.

या शिबिरांमध्ये सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत मतदार नोंदणीची सुविधा उपलब्ध राहणार आहे. विशेषतः नवमतदारांना मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी या शिबिरांचा लाभ घेता येणार आहे. याशिवाय मतदार यादीतील नावाबाबत हरकत नोंदविणे, आवश्यक दुरुस्ती करणे आदी सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

भारत निवडणूक आयोगाने मतदार यादीवरील दावे व हरकती सादर करण्यासाठी १२ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. त्यानंतर अंतिम मतदार यादी १६ नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या निर्देशानुसार जिल्ह्यात विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे.

जिल्हाधिकारी विकास मीना यांनी सर्व संबंधित उपविभागीय अधिकाऱ्यांना शिबिरांच्या आयोजनाबाबत निर्देश दिले आहेत. शिबिरांच्या दिवशी सर्व मतदान केंद्रस्तरीय अधिकारी संबंधित मतदान केंद्रावर सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत उपस्थित राहणार आहेत. मतदार नोंदणीसाठी आवश्यक नमुना क्रमांक ६, ७, ८ आदी अर्जही उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

शिबिरांची माहिती अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचावी यासाठी दवंडी, स्थानिक वृत्तपत्रे, सामाजिक माध्यमे तसेच मतदान केंद्रस्तरीय अधिकारी व पर्यवेक्षकांच्या माध्यमातून व्यापक जनजागृती करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. शिबिरांच्या दिवशी संबंधित मतदान केंद्रांना भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी करण्याचे निर्देश मतदान केंद्रस्तरीय अधिकारी, पर्यवेक्षक आणि सहाय्यक मतदार नोंदणी अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

प्रत्येक शिबिरानंतर मतदान केंद्रांची संख्या, प्राप्त अर्जांची संख्या आणि इतर आवश्यक माहितीचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयातील निवडणूक शाखेकडे सादर करावा लागणार आहे.

पात्र नागरिकांनी या संधीचा लाभ घेऊन आपले नाव मतदार यादीत नोंदवावे, असे आवाहन जिल्हा निवडणूक प्रशासनाने केले आहे.

# ध्वनिप्रदूषणाविरोधात जनजागृती अभियान

प्रतिनिधी ५ ऑक्टोबर



**दारव्हा :** सार्वजनिक सण-उत्सवांच्या काळात वाढणाऱ्या ध्वनिप्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्यावर तसेच पर्यावरणावर होणारे दुष्परिणाम टाळण्यासाठी मास्टर्स क्रीडा व बहुउद्देशीय संस्था, दारव्हा यांच्या वतीने ध्वनिप्रदूषण नियमन अभियान राबविण्यात येणार आहे. यासंदर्भात रविवार, ४ ऑक्टोबर रोजी संस्थेच्या वतीने द्वितीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले.

सण-उत्सवांचा आनंद घेताना इतर नागरिकांच्या आरोग्याचा आणि हक्कांचा विचार करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने विविध क्षेत्रांसाठी ध्वनीची मर्यादा निश्चित केली आहे. तसेच ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० अंतर्गत निर्धारित मर्यादेचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कारवाईची तरतूद आहे.

मात्र, केवळ शासन व प्रशासनाच्या माध्यमातून ध्वनिप्रदूषणाची समस्या दूर होणार नसून त्यासाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग आवश्यक असल्याचे चर्चासत्रात अधोरेखित करण्यात आले. सण-उत्सव शांतताप्रिय व पर्यावरणपूरक पद्धतीने साजरे करण्यासाठी नागरिकांनी पुढाकार घ्यावा, तसेच विविध माध्यमांतून ध्वनिप्रदूषणाच्या दुष्परिणामांबाबत जनजागृती करावी, असे आवाहन करण्यात आले. ध्वनिक्षेपकांचा मर्यादित वापर, ध्वनीची निर्धारित पातळी राखणे आणि इतर नागरिकांच्या शांततेचा विचार करणे याबाबत समाजात व्यापक जनजागृती करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला.

चर्चासत्रात गिरीश सांगाणी, सूत्रसेन भितकर, भैरव भेंडे, अश्फाक खान, राजेंद्र तरटे, गणेश दुबे, प्रवीण सोनोने यांच्यासह इतर नागरिकांनी सहभाग नोंदविला.

# ऋतुजा राठोडची राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड

प्रतिनिधी ५ ऑक्टोबर

**पुसद :** अमरावती येथे झालेल्या विभागीय शालेय कुस्ती स्पर्धेत फुलवाडी येथील स्व. अप्पासाहेब अत्रे विजाभज आश्रमशाळेची कुस्तीपटू कु. ऋतुजा रवींद्र राठोड हिने ४९ किलो वजनी गटातील फ्रीस्टाइल कुस्ती प्रकारात प्रथम क्रमांक पटकावला. या कामगिरीमुळे तिची राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, अमरावती विभागीय क्रीडा कार्यालय आणि अमरावती शहर जिल्हा कुस्ती संघ यांच्या संयुक्त विद्यमाने ३० सप्टेंबर रोजी विभागीय क्रीडा संकुल, तपोवन, अमरावती येथे विभागीय शालेय कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत ज्ञानोपासक शिक्षण प्रसारक मंडळ, फुलवाडी (ता. पुसद) संचलित स्व. अप्पासाहेब अत्रे विजाभज आश्रमशाळेतील पाच कुस्तीपटूंनी सहभाग घेतला.

ऋतुजा राठोड हिने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करीत ४९ किलो वजनी गटात प्रथम क्रमांक मिळविला. विशेष म्हणजे, मागील वर्षी सिंधुदुर्ग येथे झालेल्या राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेतही ऋतुजाने कांस्यपदक पटकावले होते. यंदा पुन्हा राज्यस्तरावर निवड झाल्याने तिच्याकडून पदकाची अपेक्षा व्यक्त होत आहे.

दरम्यान, आश्रमशाळेतील नैतिक संतोष पवार, क्रिश संतोष जयस्वाल आणि कु. रोहिणी प्रेम राठोड यांनी विभागीय स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळविला. त्यामुळे आश्रमशाळेने कुस्तीतील आपली यशस्वी परंपरा कायम राखली आहे. गेल्या पाच वर्षांपासून आश्रमशाळेचे कुस्तीपटू अमरावती विभागाचे राज्यस्तरीय स्पर्धेत प्रतिनिधित्व करीत आहेत. सलग तीन वर्षे राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत पदक मिळविण्याची कामगिरीही त्यांनी केली आहे. विजयी कुस्तीपटूंचे संस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ. दीपक चव्हाण, सचिव राजेंद्र चव्हाण, जय बजरंग बली व्यायामशाळा, फुलवाडीचे अध्यक्ष पै. विश्वास चव्हाण, मुख्याध्यापक गजानन कलिंदर तसेच शिक्षक व कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले. पुढील स्पर्धेसाठी त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. कुस्तीपटूंना क्रीडा प्रमुख इशान चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले.



# आश्रमशाळा शिक्षक-कर्मचा-यांच्या प्रलंबित प्रश्नांना मिळणार गती

## मंत्री अतुल सावे यांची मंत्रालयात बैठक; अधिकाऱ्यांना तातडीने उपाययोजनांचे निर्देश

प्रतिनिधी ५ ऑक्टोबर



**यवतमाळ :** विजाभज आश्रमशाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी इतर मागास व बहुजन कल्याण विभागाचे मंत्री अतुल सावे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालय, मुंबई येथे महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. बैठकीत आश्रमशाळा कर्मचारी व शिक्षकांच्या विविध समस्या तसेच प्रलंबित मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांबाबत मंत्री अतुल सावे यांनी सकारात्मक भूमिका घेत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या उपाययोजना तातडीने करण्याचे निर्देश दिले. त्यामुळे अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या प्रश्नांना आता गती मिळण्याची आशा निर्माण झाली आहे.

आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, यासाठी शिक्षकांनी विशेष प्रयत्न करावेत, असे निर्देशही मंत्री सावे यांनी दिले. विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षा, ऑलिम्पियाड, शिष्यवृत्ती परीक्षा तसेच अन्य शैक्षणिक स्पर्धांमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, यासाठी त्यांना मार्गदर्शन करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी खेळ व क्रीडा स्पर्धांचे आयोजन करून त्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्याचे आवाहनही त्यांनी केले. बैठकीस आमदार सुधाकर अडबाले, सचिव आप्पासाहेब धुळाज, संचालक सोनाली मुळे, सर्व प्रादेशिक उपसंचालक तसेच विभागातील प्रमुख अधिकारी उपस्थित होते. महाराष्ट्र राज्य आश्रमशाळा शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी संघटनेचे राज्याध्यक्ष बालाजी मुंडे, सरचिटणीस किशन पुंड, तुकाराम शिरसाठ, केंद्रे, मुनेश्वर, रुपेश पाटील, सानप यांच्यासह संघटनेचे प्रमुख पदाधिकारीही बैठकीला उपस्थित होते.

# ब्राह्मणगावात कृत्रिम पाणीटंचाईचे संकट

## भारनियमनाचा पाणीपुरवठ्यावर परिणाम

प्रतिनिधी ५ ऑक्टोबर

**उमरखेड :** सोईट (म) शिवारातील विहिरीवरून मागील ५० वर्षांपासून ब्राह्मणगावला ग्रामपंचायतीच्या माध्यमातून पाणीपुरवठा केला जात आहे. मात्र, विहिरीवरील विद्युत जोडणी ढाणकी सबस्टेशनअंतर्गत केल्याने भारनियमनाचा फटका बसत असून, दिवसाला केवळ आठ तास वीजपुरवठा मिळत आहे. परिणामी गावाचा पाणीपुरवठा प्रभावित झाला असून, दुष्काळसदृश परिस्थितीत ग्रामस्थांना कृत्रिम पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे.

विहिरीवर अतिरिक्त विद्युत भारामुळे वारंवार तांत्रिक बिघाड होत असल्याने यापूर्वीही गावकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत होता. त्यातच विद्युत जोडणी ढाणकी सबस्टेशनअंतर्गत गेल्याने भारनियमनाचा परिणाम पाणीपुरवठ्यावर होत आहे. त्यामुळे उपलब्ध पाणीसाठा असूनही केवळ वीजपुरवठ्याअभावी पाणी उपसण्यात अडथळे निर्माण होत आहेत. गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरीत सध्या सुमारे दोन महिने पुरेल एवढा पाणीसाठा असल्याचे पाणीपुरवठा कर्मचाऱ्यांकडून सांगण्यात येते. मात्र, भविष्यातील पाणीटंचाई टाळण्यासाठी ग्रामपंचायतीने आतापासूनच योग्य नियोजन करण्याची गरज आहे.



### नाल्याच्या खोलीकरणामुळे पाण्याचा उपयोग घटला

■ ब्राह्मणगावला पाणीपुरवठा करणाऱ्या सोईट (म) शिवारातील विहिरीजवळून गायपांदण नाला वाहतो. या नाल्यात मायनरद्वारे इसापूर धरणाचे पाणी सोडले जात असल्याने विहिरीत पाणीसाठा टिकून राहत होता. मात्र, मागील वर्षी नाल्याचे खोलीकरण करण्यात आल्याने पाणी विहिरीजवळून वाहून जात आहे. परिणामी मायनरच्या पाण्याचा विहिरीला अपेक्षित फायदा होत नाही. मागील उन्हाळ्यात विहीर कोरडी पडल्याने यंदाही पाणीटंचाईची शक्यता व्यक्त केली जात आहे. ग्रामपंचायतीने पर्यायी जलस्रोत आणि वीजपुरवठ्याबाबत तातडीने उपाययोजना करून संभाव्य पाणीटंचाई टाळावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

# सिटी न्यूज सुपरफास्ट अमरावती

५

सोमवार, दि. ५ ऑक्टोबर २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com


## ‘वन्यजीव सप्ताह’; मेळघाट व्याघ्र प्रकल्पातर्फे विविध जनजागृती उपक्रम

**2 ते 8 ऑक्टोबरदरम्यान विद्यार्थी व नागरिकांसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन**

**अमरावती:** मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावतीच्या वतीने २ ते ८ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत वन्यजीव सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. याअंतर्गत वन्यजीव संवर्धन, नैसर्गिक अधिवासांचे संरक्षण आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीचा संदेश देण्यासाठी ‘अधिवास जोडणीकरण, वन्यजीवांचे सक्षमीकरण’ या संकल्पनेवर आधारित विविध शैक्षणिक व जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

# बोगस बियाणे, खतांमुळे नापिकी होऊन दुष्काळ सदृश परिस्थिती

प्रतिनिधी ५ ऑक्टोबर

**अमरावती:** राज्यातील बुस्टर, हुतुतु तसेच इतर कंपन्यांच्या बियाण्यांबाबत, तसेच काही ठिकाणी खत व शेतपयोगी फवारणी औषधांच्या गुणवत्तेबाबत शेतकऱ्यांकडून गंभीर तक्रारी प्राप्त होत आहेत. या कृषी निविष्ठांमुळे मोठे नुकसान झाल्याचा दावा शेतकरी व आंदोलनकर्त्यांकडून करण्यात येत असून, दुष्काळसदृश्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर या नुकसानीमुळे शेतकऱ्यांसमोरील आर्थिक संकट अधिक तीव्र झाले आहे.

या पार्श्वभूमीवर विधानसभा आश्वासन समितीचे अध्यक्ष आ. रवी राणा यांच्या अध्यक्षतेखाली दि. ६ ऑक्टोबर २०२६ रोजी महत्त्वपूर्ण बैठक होणार आहे. बैठकीत कृषी विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून शेतकऱ्यांच्या तक्रारी, झालेल्या नुकसानीबाबतची कार्यवाही आणि संबंधित प्रकरणांची सद्यस्थिती जाणून घेतली जाणार आहे.

अमरावती जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी बुस्टर कंपनीच्या बियाण्यांबाबत अपेक्षित उगवण, वाढ व उत्पादन न मिळाल्याच्या तक्रारी केल्या आहेत. बियाणे, पेरणी, मशागत, खते, फवारणी, मजुरी आदींसाठी मोठा खर्च करूनही अपेक्षित उत्पादन मिळाले नसल्याने आर्थिक नुकसान झाल्याचे शेतकरी आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे. या प्रकरणाची तातडीने चौकशी करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे नुकसान निश्चित करावे, चौकशीत दोष आढळल्यास संबंधित कंपनी व जबाबदार व्यक्तींवर कायद्यानुसार फौजदारी कारवाई करावी आणि नुकसानभरपाई मिळवून द्यावी, अशी मागणी शेतकरी वर्गानंकडून प्राप्त झाली आहे.तसेच यासाठी विविध पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आंदोलन व घोषणाबाजी करीत राज्यातील प्रशासनाला निवेदन दिले.

### आठ दिवसांचा अल्टिमेटम

» प्राप्त तक्रारींची आठ दिवसांच्या आत चौकशी सुरू करून दोषींवर कायदेशीर कारवाई करावी आणि बाधित शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळवून देण्यासाठी ठोस पावले उचलावीत, अशी मागणी करण्यात आली आहे. निर्धारित कालावधीत कार्यवाही न झाल्यास बाधित शेतकऱ्यांना सोबत घेऊन लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांनी दिला आहे.

### वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून जाब व माहिती घेणार

» विधानसभा आश्वासन समितीच्या बैठकीत प्रधान सचिव (कृषी), कृषी आयुक्त, संबंधित संचालक व वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून बियाणे, खते आणि शेतपयोगी औषधांच्या गुणवत्तेबाबत प्राप्त तक्रारी, तपासणीची कार्यवाही, जबाबदारी निश्चिती आणि शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याबाबतची सद्यस्थिती जाणून घेतली जाणार आहे.

दुष्काळसदृश्य परिस्थितीत शेतकऱ्यांना नैसर्गिक संकटाचा सामना करावा लागत असताना कृषी निविष्ठांच्या गुणवत्तेबाबतच्या तक्रारींमुळे त्यांच्यावरील आर्थिक भार वाढत असल्याचा मुद्दा बैठकीत उपस्थित केला जाणार आहे. शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे, खते व फवारणी औषधे उपलब्ध करून देणे, निकृष्ट अथवा नियमबाह्य कृषी निविष्ठांबाबत जबाबदारी निश्चित करणे आणि दोषींवर कायद्यानुसार कारवाई करण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभारण्याबाबतही चर्चा होणार आहे.

दुष्काळ सदृश्य परिस्थिती बघता कंपनी होणारा पाणी पुरवठा बंद करत,कृषी सिंचन, पशुधन पिण्याचे पाणी राखून ठेवण्यासाठी, बैठकीत होणार निर्णय.

कृषी विभागासह विविध विभागांच्या प्रलंबित विषयांवरील आश्वासनांच्या कार्यवाहीला गती देण्यासाठी विधानसभा आश्वासन समितीचे अध्यक्ष आ. रवी राणा यांच्या अध्यक्षतेखाली दि. ६ ऑक्टोबर २०२६ रोजी महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली आहे. संबंधित विभागांकडून प्रलंबित आश्वासनांवरील कार्यवाहीचा आढावा घेऊन ठोस निर्णय व कालबद्ध कृती सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने या बैठकीला महत्त्व प्राप्त झाले आहे.

या बैठकीस समितीचे अध्यक्ष आ. रवी राणा यांच्यासह राजेश पवार, समीर मेघे, अनुपभैया अग्रवाल, विनोद अग्रवाल, विक्रम पाचपुते, सचिन कल्याण शेट्टी, पराग शाह, रमेश कराड, किशोर पाटील, अमोल पाटील, प्रदीप जायस्वाल, किरण सामंत, हिरामण खोसकर, जयंत बंनसोडे, दौलत दारोडा, वरुण सरदेसाई, अमित झनक आणि राजू खरे आदी समिती सदस्य आमदार उपस्थित राहणार आहेत.

तसेच मंत्रालयातील अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, कृषी आयुक्त, संचालक व सहसंचालक यांच्यासह संबंधित वरिष्ठ अधिकारी समितीसमोर विभागनिहाय माहिती व साक्ष सादर करणार आहेत. विधानसभा आश्वासन समितीचे सहसचिव श्री. नागनाथ थिटे तसेच अवर सचिव श्री. अनिल राणे हेही बैठकीस उपस्थित राहून शेतकरी हिताचा निर्णय घेणार असे अध्यक्ष आ.राणा यांचे कार्यालय सचिव उमेश ढोणे यांनी सांगितले.कालबद्ध कार्यवाहीवर भर प्रलंबित आश्वासनांवरील कार्यवाहीला गती देणे, संबंधित विभागांकडून वस्तुस्थिती जाणून घेणे आणि आवश्यक त्या निर्णयांची कालबद्ध अंमलबजावणी सुनिश्चित करणे, या दृष्टीने समितीच्या बैठकीकडे पाहिले जात आहे. कृषी निविष्ठांबाबतच्या तक्रारी, शेतकऱ्यांचे नुकसान आणि त्यावरील उपाययोजनांबाबतही बैठकीत सविस्तर माहिती घेऊन पुढील कार्यवाही निश्चित केली जाणार आहे. शेतकरी हितासाठी 06 ऑक्टोबर 2826रोजीहोणारीबैठक वादळीठरणारआहे.

## मराठा महासंघाचे संस्थापक कै. आमदार अण्णासाहेब पाटील यांची जयंती उत्साहात साजरी

प्रतिनिधी ५ ऑक्टोबर



**अमरावती :** अखिल भारतीय मराठा महासंघाचे संस्थापक, माथाडी कामगारांचे आराध्य दैवत, मराठा आरक्षणाचे जनक क्रांतीसुर्य थोर मराठा कै. अण्णासाहेब पाटील यांची जयंती स्थानिक दस्तूर नगर चौक, माऊली पॉईंट येथे उत्साहात साजरी करण्यात आली. सर्वप्रथम अण्णासाहेब पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर अण्णा साहेबांचा जयघोष करण्यात आला. जयंतीनिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. यावेळी अखिल भारतीय मराठा महासंघाचे शहराध्यक्ष भानूदासजी बोदडे पाटील, जिल्हाध्यक्ष राजेंद्र ठाकरे, शहर कार्याध्यक्ष अण्णासाहेब धोटे, उपाध्यक्ष विलासराव ठाकरे, सुधाकरराव टाले, अशोकराव ठाकरे, विलासराव वानखडे, किशोरभाऊ वडनेरकर, विठ्ठलराव देशमुख, सुनील जळीत, मनोज रोंगे, नरेश बापू देशमुख, रामेश्वर दांडगे, पांडुरंग मारके, संकेत पाटील, कैलास भेंडे, तसेच अखिल भारतीय मराठा महासंघाचे सर्व पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी विविध मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले.

## काही तासांतच राजापेठ पोलिसांनी घरफोडीचा गुन्हा केला उघड

प्रतिनिधी ५ ऑक्टोबर



**अमरावती:** काही तासांतच राजापेठ पोलीसांनी घरफोडीचा गुन्हा उघड केला आहे.

हकीकत अशा प्रकारे आहे की, फिर्यादी फीरोज खान सईन खान वय ४२ वर्ष रा. असीर कॉलणी अमरावती यांची बेलपुरा येथे बेरार मॅकेनिकल वर्कशॉप नावाचे शॉप असुन, दि. ०२.१०.२०२६ चे रोजी सायंकाळी ०७.३० त्याचे वर्कशॉप बंद करुन त्यांचे राहते घरी निघुन गेले, त्यांनतर दि. ०३.१०.२०२६ रोजी दुपारी १४.०० वाजता त्यांनी त्यांचे वर्कशॉप उघडुन पाहिले असता, त्यांना त्यांचे वर्कशॉपचे शटर तुटलेले दिसले, त्यांनी आत जावुन पाहणी केली असता, त्यांना त्यांचे वर्कशॉप मधील विविध प्रकारचे लोखंडी साहित्य व लेथ मशीन गेअर असे कि. अंदाजे ३६,६०० रु. चा माल दिसुन आला नाही, कुणातरी अज्ञात चोराचे वर्कशॉपचे आत प्रवेश करुन सदरचा माल चोरुन नेला असे फिर्यादीचे जबानी रीपोर्ट वरुन पोलीस स्टेशन ८५७/२०२६ कलम ३३१(३),३३१(४),३०५(अ) भा.न्या. स. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर गुन्हाचे गांभीर्य लक्षात घेवुन पोलीस स्टेशन राजापेठ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांचे नेतृत्वात डी.बी. पथक प्रमुख सपोनी नितीन शिंदे व डी बी. पथक यांनी सदरचा गुन्हा हा फक्त काही तासातच उघड केला.

अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव ईमरान बेग युनुस बेग वय ३० वर्ष रा. वलगाव रोड, धर्मकाटा अमरावती असे आरोपीचे नाव आहे.

आरोपीकडुन जप्त करण्यात आलेला मुददेमाल विविध प्रकारचे लोखंडी साहित्य व लेथ मशीन गेअर असे कि. अंदाजे ३६,६०० रु. चा माल जप्त करण्यात आला. सदर कार्यवाही ही राकेश ओला साहेब पोलीस आयुक्त, श्याम घुगे, पोलीस उपायुक्त परि.०२ तसेच संजय खताळे सहायक पोलीस आयुक्त राजापेठ विभाग अम.श. याचे मार्गदर्शनाखाली पोस्टे राजापेठ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांचे नेतृत्वात पोनि उमेश मुढे (गुन्हे), सपोनी नितीन शिंदे, सपोनी सचिन पवार, पोलीस अंमलदार मनिष करपे, पवन तिवारी, पंकज खटे, रवि लिखीतकर, शशीकांत शेळके, अंकुश काळे, अमोल खंडेझोड, आबीद शेख, प्रशांत बेलोरकर, रफीक खान, आकाश यादव, सतीश टपके, पंकज गाठे, अमोल देशमुख, अर्जुन कदम यांनी केलेली आहे.

## स्वच्छता अभियान, महानगरपालिकेच्या वतीने राबवले कार्यक्रम



प्रतिनिधी ५ ऑक्टोबर

**अमरावती :** अमरावती महानगरपालिका अंतर्गत UHP सेंटर महेंद्र कॉलनी अंतर्गत अहिल्या महिला आरोग्य समिती येथील महिला यांनी 2 ऑक्टोंबर गांधी जयंती स्वच्छता अभियान पवन नगर येथे आपल्या परिसरातील स्वच्छता करून साजरा करण्यात आला अहिल्या महिला आरोग्य समितीच्या अध्यक्ष कांचन गाडगे सचिव संध्या पाटील तसेच सभासद कल्पना वानखडे राधिका मरकाम व सुनंदा गवळी सर्वच महिला समितीचे सभासद हजर होते यावेळी पूर्ण परिसर महिलांनी स्वच्छ केला तसेच डेंगू विषयी जनजागृती करण्यात आली व घराघरातील पाणी साचू देऊ नका असे डेंगू विषयी मार्गदर्शन करण्यात आले आशा वर्कर संध्या पाटील यांनी हा उपक्रम राबविला.

## जबरी चोरी व दुखापतीचा गुन्हा उघडकीस

प्रतिनिधी ५ ऑक्टोबर



**अमरावती:** फक्त ४ तासांत केला राजापेठ पोलीसांनी जबरी चोरी व दुखापतीचा गुन्हा उघड केला आहे. हकीकत अशा प्रकारे आहे की, फिर्यादी नामे अंकुश मनोहर राठोड वय ३२ वर्ष रा. शिरवाडी ता. तिवसा जि. अमरावती हे दिनांक ४.१०.२०२६ रोजी पहाटे ३.३० वाजता गोपाल नगर अंडरपास जवळुन जात असताना अज्ञात २ इसमांनी हात दाखवुन मदत मागीतली असता, फिर्यादी यांनी त्यास त्याचे दुचाकीवर बसवुन समोर नेले असता, तेथे असलेल्या कच्चा रस्त्यावर नेवुन त्या इसमापैकी ०१ इसमाने फिर्यादी यास पकडले व दुसरे इसमाने फिर्यादीचे याचे डोक्यावर दगडाने मारुन जखमी केले व फिर्यादीचे खिश्यातुन ३००० रुपये रोख, विवो कंपनीचा मोबाईल कि. अं. ५००० रुपये व युनीकॉन वाहन क. एम एच २७ ई डी ९५६८ कि. अंदाजे १५०,००० रुपये असा एकुण १५८,००० रुचा माल जबरीने हिसकावुन नेवुन फिर्यादी जबर दुखापत केली असे फिर्यादीचे जबानी रीपोर्ट वरून पोलीस स्टेशन ८५६/२०२६ कलम ३०९ (६), ३(५) भा.न्या. स. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर गुन्हाचे गांभीर्य लक्षात घेवुन पोलीस स्टेशन राजापेठ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांचे नेतृत्वात डी.बी. पथक प्रमुख सपोनी नितीन शिंदे व डी बी. पथक यांनी सदरर गुन्हात कुठलाही तांत्रीक पुराव नसताना फक्त प्राप्त माहितीचे आधारे सदरचा गुन्हा हा फक्त ०४ तासात उघड केला.

अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आकाश गौतम तंतरपाळे वय २६ वर्ष रा. गोपाल नगर रेल्वे कॉसींग जवळ अमरावती, अमोल उर्फ बंटी रुपेश सावरकर वय २३ वर्ष रा. महाजनपुरा अमरावती आरोपीतांकडुन जप्त करण्यात आलेला मुददेमाल युनीकॉन दुचाकी क. एम एच २७ ई डी ९५६८ कि. अंदाजे १५०,०००, रोख रक्कम ३००० रुपये असा एकुण १५३,००० रुपये मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर कार्यवाही ही राकेश ओला, पोलीस आयुक्त, श्याम घुगे, पोलीस उपायुक्त परि.०२, संजय खताळे सहायक पोलीस आयुक्त राजापेठ विभाग अम.श. याचे मार्गदर्शनाखाली पोस्टे राजापेठ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांचे नेतृत्वात पोनि उमेश मुढे (गुन्हे), सपोनी नितीन शिंदे, सपोनी सचिन पवार, पोलीस अंमलदार मनिष करपे, पवन तिवारी, पंकज खटे, रवि लिखीतकर, शशीकांत शेळके, अंकुश काळे, अमोल खंडेझोड, आबीद शेख, प्रशांत बेलोरकर, रफीक खान, आकाश यादव, सतीश टपके, पंकज गाठे, अमोल देशमुख, अर्जुन कदम यांनी केलेली आहे.

## अलिम्को मोजमाप शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन

प्रतिनिधी ५ ऑक्टोबर

**अमरावती :** IADIP-SSA (समग्र शिक्षा) योजनेंतर्गत अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील पात्र दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी अलिम्को (ALIM-CO) संस्थेच्या तज्ञ पथकामार्फत साहित्य, साधने व सहाय्यक उपकरणे उपलब्ध करून देण्यासाठी मोजमाप शिबिर (Measurement Camp) आयोजित करण्यात आले आहे.

शिबिराची तारीख : सोमवार, दि. ०५ ऑक्टोबर २०२६

वेळ : सकाळी ०९.०० वाजता

स्थळ : मनपा मराठी प्राथमिक शाळा क्र. १९, रुक्मिणी नगर, अमरावती असे आहे.

अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील पात्र दिव्यांग विद्यार्थ्यांनी व त्यांच्या पालकांनी सदर शिबिरास आवर्जून उपस्थित राहून साहित्य, साधने व सहाय्यक उपकरणांच्या उपलब्ध सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

आवश्यक कागदपत्रे :

१. सक्षम प्राधिकरणाचे दिव्यांगत्व प्रमाणपत्र (४०% किंवा त्यापेक्षा अधिक)

२. विद्यार्थ्याच्या आधार कार्डची छायांकित प्रत

३. पालकांचा उत्पन्नाचा दाखला ४. दिव्यांगत्वाचा प्रकार स्पष्ट दिसेल असे २ पासपोर्ट साईज फोटो

एकही पात्र दिव्यांग विद्यार्थी या सुविधेपासून वंचित राहू नये, यासाठी संबंधित विद्यार्थी व पालकांनी आवश्यक कागदपत्रांसह शिबिरस्थळी वेळेत उपस्थित राहून या सुविधेचा लाभ घ्यावा.

## उपेंद्र पाटील 6 ऑक्टोबरला नामांकन अर्ज दाखल करणार

**न्याय हक्काचा उमेदवार, शिक्षकांनी हजर राहण्याचे आव्हान**

प्रतिनिधी ५ ऑक्टोबर



**अमरावती :** अमरावती विभाग शिक्षक मतदार संघ निवडणूक २०२६ निवडणुकीसाठी संघटक महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा कृती समिती, जिल्हा प्रतिनिधी विदर्भ मुख्याध्यापक संघ. तथा शैक्षणिक चळवळीतील शिक्षक समन्वय संघाचे अधिकृत उमेदवार उपेंद्र बाबाराव पाटील हे दिनांक ६ ऑक्टोबर २०२६, रोज मंगळवारला दु. १२ वाजता

राष्ट्रमाता जिजाऊ स्मारक जवळ, आयुक्त कार्यालयाच्या बाजूला, आर.टी.ओ. ऑफिस जवळ, जुना बायपास रोड, अमरावती येथून विभागीय आयुक्त कार्यालयात नामांकन अर्ज भरण्यासाठी जात आहेत.

त्या अनुषंगाने शिक्षकांचा हक्काचा उमेदवार उपेंद्र पाटील यांचा नामांकन अर्ज दाखल करण्यासाठी हजारो शिक्षकांनी उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

## शिक्षकांचे बुलंद नेतृत्व डॉ. संगीता शिंदे - बोंडे यांच्या नामांकन रॅलीत बहुसंख्येने सहभागी होण्याचे आवाहन!

प्रतिनिधी ५ ऑक्टोबर

**अमरावती :** शिक्षण संघर्ष संघटनेच्या संस्थापक अध्यक्ष, भारतीय जनता पक्षाच्या शिक्षक नेत्या आणि अमरावती विभागातील शिक्षकांच्या हक्कांसाठी सतत धडपडणाऱ्या मुलुख मैदानी तोफ डॉ. संगीता सचिंद्र शिंदे - बोंडेअमरावती विभाग शिक्षक मतदारसंघातून आपला निवडणूक उमेदवारी अर्ज दाखल करत आहेत.

शिक्षकांच्या विविध न्याय्य मागण्या, प्रलंबित प्रश्न आणि स्वाभिमानाचा लढा अधिक तीव्र करण्यासाठी काढण्यात येणाऱ्या या भव्य रॅली व शक्तिप्रदर्शनात संपूर्ण अमरावती विभागातील शिक्षक बंधू-भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, ही नम्र विनंती! संगीता शिंदे 6 ऑक्टोबर मंगळवार रोजी नामांकन दाखल करणार आहे.

## वडाळी येथे सेवा संकल्प अभियानाचा प्रारंभ

**विकसित भारत संकल्पनेवर आधारित चित्रकला व रंगभरण स्पर्धेचे आयोजन**

प्रतिनिधी ५ ऑक्टोबर

**अमरावती :** महानगरपालिका उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळा क्रमांक 14 वडाळी येथे नुकतीच सेवा संकल्प अभियानाला सुरुवात करण्यात आली. 2 ऑक्टोबर महात्मा गांधी जयंती च्या मुहूर्तावर सदर सेवा संकल्प अभियानाचा प्रारंभ करून विकसित भारत या संकल्पनेवर आधारित उच्च प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांची चित्रकला स्पर्धा घेण्यात आली तसेच प्राथमिक वर्गातील मुलांची रंगभरण स्पर्धा सुद्धा यावेळी पार पडली.

यावेळी विद्यार्थ्यांनी माझी शाळा सुंदर शाळा, माझ्या स्वप्नातील शाळा २०४७ , तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि अंतराळातील भारत, स्वच्छ, हरित व स्वयंपूर्ण भारत ,भारतीय शेती व आधुनिक शेतकरी, एक भारत, श्रेष्ठ भारत – समृद्ध संस्कृती आणि विकास या विविध विषयावर आकर्षक व सुंदर चित्रे काढली. कार्यक्रमावेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री योगेश पखाले व शिक्षकांनी महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण केले. कार्यक्रम तथा स्पर्धेच्या आयोजनाकरिता सुलोचना डाखोळे, निशा चव्हाण, स्मिता वानखडे, ज्योत्स्ना गवई,मोनिका पंधरे अनिता विधाते, प्रणिता देशमुख ,वैशाली देशमुख, मनीषा वाकोडे, ज्योती सातपुते ,नीलिमा लव्हाळे अनुप भारंबे ,चेतना बोंडे, कल्पना सवई ,भाग्यश्री गणगणे , राजकुमार जाधव, रूपाली आडोळे यांनी परिश्रम घेतले.

## शिक्षक मतदार संघाच्या निवडणुकीकरिता पाच उमेदवार युवा स्वाभिमान पार्टीच्या संपर्कात,पार्टी निवडणूक लढविणार

प्रतिनिधी ५ ऑक्टोबर



**अमरावती:** शिक्षक मतदार संघाची निवडणूक दिनांक 23 ऑक्टोबर 2026 ला होऊ घातलेली आहे. या निवडणुकीकरिता युवा स्वाभिमान पार्टी सज्ज झालेली आहे.युवा स्वाभिमान पार्टीच्या पक्ष कार्यालयामध्ये अनेक दिग्गजांनी उमेदवारी मागितली आहे या दिग्गजांमध्ये अमरावती महानगरपालिकेच्या शिक्षण सभापती एडवोकेट प्रीतीताई रेवणे ,महानगरपालिकेचे गटनेता नगरसेवक प्राध्यापक नानाभाऊ आमले ,शिक्षण संस्थानिक तथा मोर्शी पंचायत समितीच्या माजी उपसभापती सोनालीताई नवले ,आंबेडकरी चळवळीचे खंदे कार्यकर्ते सोपान कांबळे,प्रा.प्रशांत वानखडे नगरसेवक व इतर चार ते पाच दिग्गजांनी उमेदवारीसाठी अथक प्रयत्न चालविली आहे .सर्व उमेदवारांची चाचपडनी युवा स्वाभिमान पार्टीचे सुनील भाऊ राणा यांचे अध्यक्षतेखाली करण्यात आली.या आढावा बैठकीमध्ये युवा स्वाभिमान पार्टीचे राष्ट्रीय सचिव जयंतराव वानखडे ,समाधान वानखेडे,अजयजी गाडे , प्रकाश साबळे,सुमतीताई ढोके,नगरसेवक दिपक साहू, नगरसेवक नंदा सावदे, नगरसेवक रजनी डोंगरे, नगरसेवक मीराताई कांबळे,अजय जयस्वाल, उपमहापौर सचिन भाऊ भेंडे ,विनोद जैस्वाल,किशोर जाधव,महेश मूलचंदानी,योगेश विजयकर,नगरसेवक अर्चना पांडे, नगरसेवक गौरी मेघवानी,नगरसेवक संजय हिंगलासपुरे,नगरसेवक प्रियंका पाटणे, नगरसेवक मीराताई कांबळे,नितिन बोरेकर,रवींद्र गावंडे,अशोक पांडे,सुरेंद्र वाघमारे,मनोज डहाके, व सर्व नगरसेवक उपस्थित होते. या उमेदवारांमधील एका उमेदवाराचे उमेदवारी निश्चित करून ही निवडणूक लढविल्या जाणार आहे या निवडणुकीत या युवा स्वाभिमान पार्टीच्या उमेदवारामुळे निवडणुकीचे चित्र अगदी स्पष्ट होणार आहे .युवा स्वाभिमान पार्टीच्या कार्याचा चढता आलेख, लोक संपर्क ,शिक्षकांचे हाताळलेले प्रश्न, त्यांच्या सोडवलेल्या समस्या ,शिक्षकांच्या सतत संपर्कात असलेले आमदार व माजी खासदार यामुळे या निवडणुकीचे चित्र हे वेगळे राहणार आहे.





कसे होईल विकासाचे काम, सरपंच मागतो ४० हजारांचे दाम!
कथित पैशांच्या मागणीची ऑडिओ क्लिप सिटी न्यूज सुपरफास्टच्या हाती

भ्रष्टाचार हमेशा, टक्केवारीचा 'श्रीगणेशा'!
*सरपंच म्हणतो, 'द्या दाम, नाहीतर बंद करा काम' * ४० हजार रुपयांची कथित मागणी; तर इतर कामांतुन किती असतील 'गिळले'

सिटी न्यूज वाशीम
वसुलीची हद्द, ऑडीओतून सिध्द, सरपंच मागतो खुद्द!
*दिड लाखाचे काम, म्हणे ४० हजार द्या दाम *नाव सरपंचाचे देवाचे; करतो कथित कारनामे दैत्याचे

शनिवार दि. ३ ऑक्टोबर २०२६ http://epaper.citynewssuperfast.com
प्रकरण विकास कामाच्या निधीतून सरपंचाने ४० हजार रुपये मागणीचे...
भ्रष्टाचार ग्रेट, टक्केवारी मागतो थेट!
'सरपंचाच्या दलाल चेतन म्हणतो, एक-एकाला पाहतो...'
● प्रभाकर नाईकवाडे @ केनवड ●
विकासकामातील पैशांच्या कथित मागणीविरोधात आवाज उठवल्यानंतर आता 'एक-एकाला पाहतो...' अशा आशयाचे कथित वक्तव्य समोर आले आहे. हे वक्तव्य ... विद्यार्थ्यांसाठी आलेल्या निधीबाबत उपस्थित झालेले प्रश्न आणि घरकुलासाठी २०-२० हजार रुपये घेतल्याच्या कथित आरोपांनंतर आता हा प्रकार समोर आला आहे. 'एक-एकाला पाहतो' असे म्हणत नागरिकांना धमकावण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप होत आहे. यामागे कोणाकोणाचे हात ... धमकावले जात असल्याचा आरोप करण्यात येत आहे. 'मी एकाला पाहतो' या अशा आशयाचे वक्तव्य गावात चेतन नावाची व्यक्ती करत फिरत असल्याचा दावा करण्यात येत आहे. भ्रष्टाचाराचे आरोप समोर आणणाऱ्या घरकुल लाभार्थ्यांनाच लक्ष्य करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप होत आहे. 'एक-



# चेतनची दलाली भारी, करतो लाचारी, वसुलीसाठी हिंडतो दारोदारी, सर्वांचीचं भागीदारी !



## घरकुल लाभार्थ्यांकडून २०-२० हजारांची मागणी

● सिटी न्युज ब्युरो @ केनवड ●

केनवडपासून जवळच असलेल्या एका गावात घरकुल योजनेत नाव समाविष्ट करून देतो, लाभ मिळवून देतो, हप्ता काढून देतो, एवढेच नव्हे तर बोगस घरावरही हप्ता काढून देतो, असे सांगून २०-२० हजार रुपये घेतल्याचा गंभीर आरोप चेतन नावाच्या व्यक्तीवर लाभार्थ्यांकडून करण्यात येत आहे. पैसे न दिल्यास घरकुल थांबवण्याची आणि हप्ता रोखण्याची दमदाटी केली जात असल्याचा आरोपही करण्यात आल्याने या प्रकाराची सखोल चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे.

लाभार्थ्यांच्या आरोपानुसार, घरकुल योजनेतील नाव समाविष्ट करणे, लाभ मिळवून देणे आणि हप्ते काढून देण्याच्या नावाखाली चेतन नावाची व्यक्ती पैसे मागत असल्याचे सांगितले जात आहे. '२० हजार रुपये द्या, काम करून देतो' अशा प्रकारे पैशांची मागणी केली जात असल्याचा आरोप आहे. पैसे दिले नाहीत तर घरकुल थांबवतो, हप्ता रोखतो, अशा प्रकारची दमदाटी केली जात असल्याचा आरोप लाभार्थ्यांकडून करण्यात येत आहे. गरीब लाभार्थ्यांचे घरकुल बंद पडेल, हप्ते मिळणार नाहीत, या भीतीपोटी काही लाभार्थी पैसे देत असल्याचेही सांगितले जात आहे.विशेष म्हणजे, ग्रामपंचायतीच्या कामकाजाशी कोणताही अधिकृत संबंध नसतानाही संबंधित व्यक्ती घरकुल लाभार्थ्यांमध्ये हस्तक्षेप करून पैशांची मागणी करत असल्याचा आरोप आहे. त्यामुळे घरकुल योजनेत मध्यस्थ म्हणून नेमकी कोणाला अधिकृत भूमिका आहे? चेतन नावाच्या व्यक्तीला लाभार्थ्यांकडून पैसे मागण्याचा अधिकार कोणी दिला? असे प्रश्न उपस्थित होत आहेत.काही दिवसांपूर्वी संबंधित व्यक्ती पंचायत समिती, रिसोड येथे कार्यरत असल्याचे समजते, असा दावा करण्यात येत आहे. जर घरकुल विभागाशी संबंधित कामकाजात त्याची कोणतीही भूमिका असेल, तर या प्रकाराची अधिकृत चौकशी करून सत्य समोर आणावे, अशी मागणी लाभार्थ्यांकडून होत आहे.ग्रामपंचायतीशी कोणताही अधिकृत संबंध नसताना विकासकामांमध्येही लुडबुड करून नागरिकांवर दबाव आणत पैसे मागितले जात असल्याचा आरोप करण्यात येत आहे. तसेच आपल्या जवळच्या व्यक्तींना कामे देऊन बोगस कामे करून घेतल्याचा आरोपही करण्यात आला आहे.या सर्व आरोपांची सखोल चौकशी करून चेतन नावाच्या व्यक्तीवर कायदेशीर कारवाई करावी, तसेच ग्रामपंचायतीच्या कामकाजात अनधिकृत हस्तक्षेप होणार नाही यासाठी आवश्यक पावले उचलावीत, अशी मागणी ग्रामस्थ व लाभार्थ्यांकडून जोर धरत आहे.तसेच पंचायत समिती स्तरावरही या व्यक्तीची नेमकी भूमिका काय आहे, याची चौकशी करून दोष आढळल्यास नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी करण्यात येत आहे. घरकुलाच्या नावाखाली गरीब लाभार्थ्यांकडून पैशांची कथित मागणी आणि विकासकामांमध्ये कथित हस्तक्षेप या दोन्ही आरोपांची निष्पक्ष चौकशी झाल्यासच या संपूर्ण प्रकारामागील सत्य समोर येणार आहे.

### 'चेतनचा चढला माज; गरीब लाभार्थ्यांवर दमदाटी करुंन राज!'

घरकुलाचा लाभ मिळवून देण्याच्या नावाखाली २०-२० हजार रुपये घेतल्याचा लाभार्थ्यांचा आरोप; पैसे न दिल्यास हप्ता थांबवण्याची कथित धमकी देतो, घरकुल योजनेतील नाव समाविष्ट करणे, हप्ता काढून देणे आणि लाभ मिळवून देण्याच्या नावाखाली पैशांची कथित मागणी होत असल्याचा आरोप लाभार्थ्यांकडून करण्यात येत आहे. गरीब लाभार्थ्यांच्या अडचणीचा फायदा घेतला जातोय का? असा सवाल उपस्थित होत आहे.ग्रामपंचायतीशी अधिकृत संबंध नसतानाही घरकुल व विकासकामांमध्ये कथित हस्तक्षेप होत असल्याच्या आरोपांची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

## थोडक्यात

### शासकीय तंत्रनिकेतनमधून श्रावणी गोमासे अव्वल



● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●



वाशिम च्या शासकीय पॉलिटेक्निक कॉलेज च्या इलेक्ट्रॉनिक अँड टेलीकम्युनिकेशन या शाखेमधील प्रथम वर्षाच्या परीक्षेत श्रावणी किशोर गोमाशे ही विद्यार्थिनी अव्वल आल्याने ती गोल्ड मेडल ची मानकरी ठरली आहे.या सहश्रावणी गोमाशे ने पाणी बचत आणि पर्यावरणाचे रक्षण या विषयावरील चित्र स्पर्धेत सिल्वर पदक मिळविले.पॉलिटेक्निक कॉलेज मध्ये नुकतेच एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते त्यामध्ये श्रावणी गोमाशे चा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमासाठी साठी पॉलिटेक्निक चे प्राचार्य बालाजी गवलवाड,माजी विद्यार्थी पंकज बाजड,सुनील कदम,अनिल घुनागे,शंकर मोहोकार,मुख्यमंत्री सडक योजनेचे कार्यकारी अभियंता राजेश सोनलवार यांच्यासह इतर मान्यवरांची उपस्थिती होती.यावेळी कॉलेज मधील इतर ही गुणवंत विद्यार्थांना सन्मानित करण्यात आले.कार्यक्रमासाठी विद्यार्थी आणि पालकांची उपस्थिती होती.

### इन्नाणी महाविद्यालयात गांधीवादाच्या प्रासंगिकतेवर कार्यशाळा



● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●

हिंसा,असहिष्णुता,असत्य आणि नैतिक मूल्यांच्या ऱ्हासाच्या वर्तमान काळात महात्मा गांधींच्या सत्य आणि अहिंसेच्या विचारांची प्रासंगिकता अधिक अधोरेखित होते. गांधीविचार हा केवळ एका कालखंडापुरता मर्यादित नसून माणूसपण जपणारी आणि सर्वांच्या हिताचा विचार करणारी जीवनदृष्टी आहे,असे प्रतिपादन अॅड. सुमंत बंडाळे यांनी केले.स्वा.क.रा.इन्नाणी महाविद्यालयात गांधी जयंतीनिमित्त १ ऑक्टोबर रोजी मानवी मूल्यांच्या ऱ्हासाच्या युगात गांधीवादाची प्रासंगिकता सत्य आणि अहिंसेचा पुनर्विचार या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा झाली.प्राचार्य डॉ.आर.एम.पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य प्रा.ए.डी.बरडे होते.प्रमुख वक्ते म्हणून ?ड.सुमंत बंडाळे उपस्थित होते.आय क्यू ए सी समन्वयक डॉ. एन.जी.जाधव आणि डॉ. डी.पी.पराते व्यासपीठावर उपस्थित होते.महात्मा गांधींच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आणि दीपप्रज्वलनाने कार्यशाळेचा प्रारंभ झाला. प्रास्ताविकात डॉ.एन.जी.जाधव यांनी वर्तमान सामाजिक,राजकीय आणि आर्थिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर कार्यशाळेच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली.हिंसा,द्वेष आणि असहिष्णुतेच्या वातावरणात सत्य,अहिंसा,संवाद आणि नैतिक मूल्यांचा पुनर्विचार आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.अॅड.बंडाळे यांनी गांधीजींच्या विचारांची समकालीन संदर्भातील उपयुक्तता स्पष्ट करताना सत्य आणि अहिंसा ही केवळ गांधीजींच्या वैयक्तिक जीवनातील तत्त्वे नसून न्याय्य,शांततामय आणि संवेदनशील समाजनिर्मितीची मूल्ये असल्याचे सांगितले.गांधीविचाराचा अंत होत नाही, बदलत्या काळात त्याचा अर्थ नव्याने समजून घेण्याची गरज आहे,असेही त्यांनी नमूद केले. कार्यशाळेस महाविद्यालयातील २०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ.आर. एच.माथुरकर,प्रा.अनूप नंदगावकर, डॉ.व्ही.आर. ढेंगळे, डॉ.एस.के.थोरात,डॉ.एम.के.कावरे,प्रा.के.व्ही. सोमवंशी,प्रा. एस. के.कोकाटे,प्रा.पी.एम.इंगळे आणि प्रा.एस.आर.अमलेकर यांनी परिश्रम घेतले.

## वाढदिवसाचा अनावश्यक खर्च टाळून संकटग्रस्त शेतकऱ्यांना मदत करा- अॅड.नकुल देशमुख

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

### मुख्यमंत्री सहाय्यता निधीत भरीव मदत देणार

भाजपा रिसोड-मालेगाव विधानसभा निवडणूक प्रमुख अॅड. नकुल अनंतराव देशमुख यांचा वाढदिवस ९ ऑक्टोबर रोजी होत आहे. यानिमित्ताने अनावश्यक बॅनरबाजी, हार-तुरे तसेच इतर खर्चाला फाटा देऊन, त्याऐवजी हा खर्च मुख्यमंत्री सहाय्यता निधीत भरीव मदत म्हणून द्यावा, असे आवाहन नकुल देशमुख यांनी केले आहे.

मा. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत संकटग्रस्त शेतकरी बांधवांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे ही आपली सामाजिक बांधिलकी असल्याचे त्यांनी म्हटले आहे.



आपल्या वाढदिवसानिमित्त मित्रपरिवार, हितचिंतक तसेच भाजपा पक्षाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अनावश्यक खर्च टाळून गरजू व संकटग्रस्त शेतकरी बांधवांच्या मदतीसाठी हातभार लावावा, असे आवाहन नकुल देशमुख यांनी केले आहे.विशेष म्हणजे, मागील वर्षीही नकुल देशमुख यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त अनावश्यक खर्चाला फाटा देत मित्रपरिवाराच्या सहकार्याने मुख्यमंत्री सहाय्यता निधीत भरीव मदत केली होती. यंदाही त्याच सामाजिक बांधिलकीची परंपरा कायम ठेवत वाढदिवसाचा खर्च गरजूंच्या मदतीसाठी उपयोगी पडावा, अशी भूमिका त्यांनी घेतली आहे. आणि सदर अनावश्यक खर्च टाळत भरून निधी मुख्यमंत्री सहायता निधी मध्ये देण्यात येणार असल्याचे भारतीय जनता पक्ष रिसोड मालेगाव विधानसभा व नकुल देशमुख मित्रपरिवार रिसोड मालेगाव विधानसभा यांच्या वतीने प्रसिद्धी दिलेल्या पत्रकाद्वारे सांगितले आहे.वाढदिवसाचा उत्सव केवळ औपचारिक स्वरूपात न करता, संकटात असलेल्या शेतकरी बांधवांच्या मदतीसाठी योगदान देण्याचा सामाजिक संदेश नकुल देशमुख यांच्या या आवाहनातून देण्यात आला आहे.

## केवळ घोषणांचा दिलासा नको, थेट मदत द्या- सुधाकरराव देशमुख

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

रिसोड राज्यातील अनके तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्याचा निर्णय शासनाने घेतला असला, तरी शेतकऱ्यांना अद्याप ठोस आर्थिक मदत मिळालेली नाही. दुष्काळ जाहीर करण्यापुरतीच शासनाची भूमिका मर्यादित राहणार आहे का? असा सवाल उपस्थित करीत महाविकास आघाडीचे जिल्हा समन्वयक सुधाकरराव देशमुख यांनी सरकारवर टीका केली. यंदा पावसाच्या लहरीपणामुळे राज्यातील अनेक भागांत पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.



सोयाबीनसह विविध पिकांचे उत्पादन घटल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. अशा परिस्थितीत शासनाने हेक्टरी किमान एकलाख रुपयांची सरसकट मदत देणे अपेक्षित होते. मात्र, दुष्काळ जाहीर करण्याचा निर्णय घेऊनही प्रत्यक्ष आर्थिक मदतीबाबत ठोस कार्यवाही होत नसल्याचा आरोप देशमुख यांनी केला. जुन्या निकषांनुसार जीआर काढून वेळकाढूपणा करण्याऐवजी दुष्काळाची तीव्रता लक्षात घेऊन शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक दिलासा द्यावा. संकटग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यात थेट आर्थिक भरपाई जमा करावी, अशी मागणी त्यांनी केली. शासनाने केवळ घोषणांपुरते मर्यादित न राहता नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत द्यावी, अशी भूमिका सुधाकरराव देशमुख यांनी मांडली.

## रा.कॉं.च्या विधानसभा समन्वयपदी डॉ.विशाल सोमटकर यांची नियुक्ती

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने विधानसभा मतदारसंघनिहाय समन्वयकांची नियुक्त्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे यांनी २ ऑक्टोबर २०२६ रोजी जाहीर केल्या आहेत. त्यानुसार वाशीम-मंगरूळपीर विधानसभा मतदारसंघाच्या समन्वयकपदी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे युवा नेतृत्व डॉ. विशाल सोमटकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.ष्मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरिक्षण हा निवडणूक प्रक्रियेच्या दृष्टीने महत्त्वाचा उपक्रम असून, मतदार यादीतील पात्र मतदारांची नावे कायम राहणे, अपात्र अथवा दुबार नोंदींची पडताळणी होणे तसेच नागरिकांना मतदार यादीशी संबंधित आवश्यक माहिती व मार्गदर्शन मिळणे, या दृष्टीने समन्वयकांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. वाशीम-मंगरूळपीर विधानसभा मतदारसंघात



या कार्यक्रमाच्या अनुषंगाने पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये समन्वय साधण्याची जबाबदारी डॉ. सोमटकर यांच्यावर सोपविण्यात आली आहे.डॉ. विशाल सोमटकर यांच्या नियुक्तीमुळे राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. पक्षाच्या संघटनात्मक कामकाजात सक्रिय असलेल्या डॉ. सोमटकर यांच्यावर सोपविण्यात आलेली ही जबाबदारी ते प्रभावीपणे पार पाडतील, असा विश्वास पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. तर निवडी संदर्भात बोलताना डॉ. विशाल सोमटकर यांनी या निवडीचे श्रेय आदरणीय चंद्रकांतदादा ठाकरे साहेब यांना दिल्याचे सांगितले.

## पाणीपुरवठ्याचे काटेकोर नियोजन करा !

### मुख्याधिकारी मुंडे यांचा नगरपरिषदेत विकासकामांचा आढावा; घनकचरा व्यवस्थापनावरही भर

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

नगरपरिषदेत नव्याने रुजू झालेले मुख्याधिकारी श्री. मुंडे यांनी ३० सप्टेंबर रोजी नगरपरिषदेत विविध विकासकामांचा आढावा घेतला. यावेळी शहरातील पाणीपुरवठ्याच्या प्रश्नावर विशेष चर्चा करण्यात आली. यंदा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता लक्षात घेता पाण्याचे जपून व काटेकोर व्यवस्थापन करून नागरिकांना वेळेवर सुरळीत पाणीपुरवठा करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. तसेच पाणी बचतीसाठी नागरिकांनीही नगरपरिषदेला सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले.



मुख्याधिकारी मुंडे यांनी नागरिकांच्या समस्या तसेच नगरपरिषदेच्या कामकाजाची माहिती घेण्यासाठी आठवड्यातून एक दिवस, विशेषतः शुक्रवारी, नगरपरिषदेत पूर्णवेळ उपस्थित राहावे, अशी विनंती सभागृहातील सदस्यांनी केली. या विनंतीला सकारात्मक प्रतिसाद देत आठवड्यातून एक दिवस नगरपरिषदेत उपस्थित राहून नागरिकांच्या अडीअडचणी व विकासकामांचा आढावा घेण्याचे आश्वासन मुख्याधिकाऱ्यांनी दिले.दरम्यान, उपनगराध्यक्ष तथा आरोग्य सभापती अनिल गावंडे यांनी शहरातील आरोग्यविषयक नियोजनाची माहिती मुख्याधिकाऱ्यांना दिली. तसेच घनकचरा डेपोमध्ये सध्या निर्माण झालेल्या समस्यांची पाहणी करण्यात आली. मुख्याधिकारी मुंडे यांनी घनकचरा डेपोची पाहणी करून ओला व सुका कचरा स्वतंत्रपणे संकलित करून त्यापासून खतनिर्मिती करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.यावेळी नगराध्यक्ष अशोक परळीकर, उपनगराध्यक्ष तथा आरोग्य सभापती अनिल गावंडे, गटनेते गणेश खोडे, पाणीपुरवठा सभापती सुधीर घोडचर तसेच आरोग्य विभागातील वरिष्ठ कर्मचारी उपस्थित होते.हवे असल्यास याच बातमीसाठी अधिक आक्रमक मुख्य मथळा आणि ५ उपमथळ्यांचे पर्यायङ्‌ही तयार करून देऊ शकतो.

## डॉ बाबासाहेब आंबेडकर मैदानाचे सौंदर्यकरण, करून टॉऊन हॉलचे करा नुतनीकरण !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

स्थानिक डॉ बाबासाहेब आंबेडकर चौकाला लागूनच असलेले डॉ बाबासाहेब आंबेडकर मैदान आहे.हे मैदान गेल्या ५० वर्षापासून बौद्ध समाजाचे ताब्यात असून या मैदानाध्ये बौद्ध समाजाचे वतीने बौद्ध धर्माचे धार्मिक कार्यक्रम होत असतात.

परंतु हे मैदान वाशीम नगरपालिकेच्या नांवाने असल्याने या मैदानाचे सौंदर्य करण करून मैदानाला लागून असलेल्या टॉऊन हॉलचे नुतनीकरण करून ते समाजाच्या ताब्यात देण्यात यावे.अशा प्रकारचे निवेदन दि.१ ऑक्टोबर २६ रोजी नगर परिषद चे अध्यक्ष अनिल केंदळे यांना जेष्ठ समाजसेवक मधुकर जुमडे, मनिष भालेराव व भुषण मोरे यांनी निवेदन देऊन मागणी केली आहे. पुढे निवेदनात असे नमूद केले





### सामाजिक कार्यकर्ते मधुकर जुमडे यांची मागणी

आहे की, वाशीम येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर मैदान हे बौद्ध समाजाचे दृष्टीने अत्यंत महत्वाचे असून या मैदानावर कोणत्याही खाजगी संस्थेचा व वैयक्तिक अधिकार नाही.म्हणून या मैदानाचे सौंदर्य करण व मैदानाला लागूनच असलेले टॉऊन हॉलचे नुतनीकरण करून ते बौद्ध समाजाचे ताब्यात देण्यात यावे.जेणे करून यामुळे शहरांचे सौंदर्य वाढेल.व बौद्ध समाजाचे धार्मिक उत्सव चांगल्या प्रकारे होतील. यावेळी नगराध्यक्ष अनिल केंदळे यांचेशी सविस्तर चर्चा करण्यात आली.चर्चे दरम्यान अध्यक्षाने डॉ बाबासाहेब आंबेडकर मैदानाचे सौंदर्य करण करून विकास करण्याचे आश्वासन दिले आहे.निवेदनावर जेष्ठ समाजसेवक मधुकर जुमडे, मनिष भालेराव व भुषण मोरे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## चित्र ऋषी वृद्धाश्रमात ज्येष्ठ नागरिक दिन

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

मंगरुळपिर लगत असलेले चित्रऋषी महाराज वृद्धाश्रम तुळजापूर येथे १ आक्टोंबर २०२६ रोजी जेष्ठ नागरिक दिन साजरा करण्यात आला याप्रसंगी युवा कार्ये व क्रीडा.मंत्रालय भारत सरकार च्या आरुषी मॅडम आय.ए.एस जिल्हा युवा अधिकारी भारत अभियान वाशिम, हीं.एम लाकडे गृहपाल, स्वाती.अकोलकर अधीक्षिका शासकीय निवासी मुलींचे वस्तीगृह मंगरूळपीर हे प्रमुख उपस्थित होते

विद्यालयाचे प्राचार्य अभिजीत राठोड कार्यक्रम अध्यक्ष म्हणून होते. आरुषी अभिजीत राठोड यांनी गेल्या ३७ वर्षापासून वृद्धाश्रमा मार्फत ज्येष्ठ नागरिकांसाठी देण्यात येणाऱ्या सुख सुविधा व संस्थेमार्फत इतर सामाजिक कार्य बद्दल सविस्तर माहिती दिली .



आरुषी मॅडम व सरस्वती समाजकार्य महाविद्यालय वाशिम येथील विद्यार्थिनी आकांक्षा गायकवाड , अंजली इंगोले, दीक्षा भगत यांनी वृद्धाश्रमातील वृद्धां सोबत सामूहिक संवाद साधला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री सरपाते यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री एस सी चव्हाण यांनी केले. या कार्यक्रमाला निलेश खोराने युवा भारत अभियान आणि श्री अनिल चव्हाण ,नारायण गिरी आदि सर्व विद्यालयातील कर्मचाऱ्यांची व विद्यालयातील दिव्यांग विद्यार्थी उपस्थिती लाभली.

# दंडे स्वामी, चंदनशेष मंदिर व बारादरी परिसरात जलवाहिनी फुटली!

प्रतिनिधी ५ ऑक्टोबर

**खामगाव :** शहरातील विविध भागांत जलवाहिन्या फुटण्याच्या घटना सातत्याने घडत असल्याने पाणीपुरवठा यंत्रणा विस्कळीत झाली आहे. शनिवारी दंडे स्वामी मंदिर, चंदनशेष मंदिर आणि बारादरी परिसरात पाइपलाइन फुटल्याने मोठ्या प्रमाणात पाणी रस्त्यावर वाहून गेले. त्यामुळे संबंधित भागातील नागरिकांना पाणीपुरवठ्याचा फटका बसला आहे. शहरात मागील काही दिवसांपासून जलवाहिनी फुटण्याच्या घटना सुरू आहेत. शुक्रवारी महावीर चौक आणि जगदंबा चौक परिसरात पाइपलाइन फुटली होती. त्यानंतर



अवघ्या एका जलवाहिनी दिवसात शनिवारी दंडे स्वामी मंदिर, चंदनशेष मंदिर आणि बारादरी परिसरातील फुटल्याने शहरातील पाणीपुरवठा व्यवस्थेवर आणखी ताण निर्माण झाला आहे.

**दुरुस्ती करण्याची मागणी**

वारंवार जलवाहिन्या फुटण्याच्या घटनांमुळे शहरातील पाणीपुरवठा व्यवस्थेच्या देखभाल-दुरुस्तीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. जुन्या व जीर्ण झालेल्या जलवाहिन्यांची दुरुस्ती करण्याची मागणी होत आहे.

### प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची मागणी

» जलवाहिनी फुटल्यानंतर संबंधित ठिकाणी पाणीपुरवठा बंद करून दुरुस्तीचे काम हाती घेणे आवश्यक ठरते. मात्र, वारंवार अशा घटना घडत असल्याने प्रत्येक वेळी दुरुस्तीची प्रक्रिया करावी लागत आहे. त्यामुळे जलवाहिनी फुटण्याची कारणे शोधून त्यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची गरज आहे. त्यासाठी जुन्या पाइपलाइनची स्थिती तपासून संवेदनशील ठिकाणी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# युगधर्मच्या यंग चॅम्पियन्सची विजयी भरारी!

## अंडर-१७ क्रिकेटमध्ये खामगावचे जिल्हास्तरावर प्रतिनिधित्व करण्याचा मान

प्रतिनिधी ५ ऑक्टोबर



**खामगाव :** क्रीडा व युवक संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धांना सध्या जी. एस. कॉलेज, खामगाव येथे उत्साहात सुरुवात झाली आहे. या स्पर्धेअंतर्गत नुकत्याच पार पडलेल्या शालेय अंडर-१७ क्रिकेट स्पर्धेत युगधर्म पब्लिक स्कूल, खामगावच्या क्रिकेट संघाने उत्कृष्ट आणि दमदार कामगिरी करत जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी आपले स्थान निश्चित केले. खामगाव शहरातील जवळपास १५ शाळांनी या क्रिकेट स्पर्धेत सहभाग नोंदविला होता. अत्यंत चुरशीच्या आणि अटीतटीच्या सामन्यांमध्ये युगधर्म पब्लिक स्कूलच्या संघाने राणा लकी सनंदा संघाचा पराभव करत विजयी कामगिरी नोंदवली आणि आता जिल्हास्तरावर खामगाव शहराचे प्रतिनिधित्व करण्याचा मान मिळविला आहे. या विजयी संघाचे नेतृत्व अस्मितराज देशमुख याने केले, तर देवांशू पवार याने उपकर्णधाराची जबाबदारी सांभाळली. संघाच्या विजयात प्रतीक यादव याची हॅट्रिक ओव्हर, तसेच सहयोग मोरे याची मेडन ओव्हर विशेष उल्लेखनीय ठरली. संघाच्या यशस्वी कामगिरीत सलमान फारुकी, हार्दिक जैन, संचित मंत्री, राजवीर, आदर्श ठाकूर, वियोग मोरे, आर्यन देशमुख, रुद्र इंगळे, वरंकर तसेच इतर सर्व खेळाडूंचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले. संपूर्ण स्पर्धेत संघाने उत्कृष्ट सांघिक खेळाचे प्रदर्शन करत अंतिम फेरी गाठली आणि जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळविली. संघाचा कर्णधार अस्मितराज देशमुख याने आपल्या संघाच्या यशाचे श्रेय शाळेचे अध्यक्ष गोपाल अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाला दिले. अध्यक्षांनी वेळोवेळी खेळाडूंचा उत्साह वाढवून दिलेल्या मौल्यवान टिप्सचा संघाला मोठा फायदा झाल्याचे त्याने सांगितले. शाळेचे सचिव श्री. मधुरजी अग्रवाल यांनी सर्व खेळाडूंचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. शाळेचे प्राचार्य श्री. अनिरुद्ध अवचार यांनी विजयी खेळाडूंचे अभिनंदन करताना, जिल्हास्तरावर खामगाव शहराचे प्रतिनिधित्व करताना याच जिद्दीने, आत्मविश्वासाने आणि सांघिक भावनेने उत्कृष्ट कामगिरी करण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले.

या खेळाडूंना यशस्वी करण्यासाठी शाळेचे क्रीडा शिक्षक श्री. शहबाज खान यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांनी उत्तम सराव, शिस्त आणि सांघिक खेळाचे दर्शन घडविले. युगधर्म पब्लिक स्कूलच्या अंडर-१७ क्रिकेट संघाच्या या उल्लेखनीय यशाबद्दल शाळा परिवार, पालक व क्रीडाप्रेमींकडून सर्व खेळाडूंचे अभिनंदन होत असून, जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी संघाला मनःपूर्वक शुभेच्छा!

# लग्नातील वादातून तरुणावर चाकूने हल्ला!

प्रतिनिधी ५ ऑक्टोबर

**मलकापूर :** लग्नातील वादाच्या कारणावरून झालेल्या भांडणात २६ वर्षीय तरुणावर चाकूने हल्ला करण्यात आल्याची घटना ३ ऑक्टोबर रोजी सायंकाळी छोटा बाजार परिसरात घडली. या हल्ल्यात शेख जावेद शेख सहीद हा गंभीर जखमी झाला. याप्रकरणी जखमीचे वडील शेख सहीद शेख अब्दुल्ला यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मलकापूर शहर पोलिसांनी दानिश मिर्झा हारुन मिर्झा (२२, रा. बारादरी, मलकापूर) व अन्य एकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादीनुसार, लग्नातील वादाच्या कारणावरून आरोपींनी जावेद याला शिवीगाळ केली. त्यानंतर दानिश मिर्झा याने जीवे मारण्याच्या उद्देशाने जावेदच्या पाठीवर चाकूने वार केल्याचे तक्रारीत नमूद आहे. हल्ल्यानंतर जावेद याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. याप्रकरणी मलकापूर शहर पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम १०९ (१), ३५२ व ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक कुणाल जाधव करीत आहेत.

# ज्ञानगंगा अभयारण्यात एक ट्रक प्लास्टिक कचरा संकलित; वन्यजीव सप्ताहानिमित्त विशेष अभियान

## वन्यजीव संवर्धनाबाबत पथनाट्याद्वारे जनजागृती

प्रतिनिधी ५ ऑक्टोबर

**खामगाव :** वन्यजीव सप्ताहानिमित्त वन्यजीव परिक्षेत्र (खामगाव), तरुणाई फाऊंडेशन, नवसंकल्प ग्रुप आणि वर्ल्ड फॉर नेचर (खामगाव) यांच्या संयुक्त विद्यमाने ४ ऑक्टोबर रोजी ज्ञानगंगा अभयारण्य परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

खामगाव-बुलढाणा मार्गावरील चिंचफाटा ते बोथा फॉरेस्ट नाका या सुमारे तीन किलोमीटर परिसरातून प्रवाशांनी फेकलेल्या प्लास्टिकच्या पाण्याच्या बाटल्या, जंक फूडचे रॅपर, प्लास्टिक कॅरीबॅग तसेच अन्य अजैविक कचरा संकलित करण्यात आला. या अभियानादरम्यान सुमारे एक ट्रक प्लास्टिक व अजैविक कचरा गोळा करण्यात आला. तसेच रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या प्रवाशांमध्ये वन्यजीव संवर्धनाबाबत जनजागृती करण्यासाठी पथनाट्य सादर करण्यात आले.अभियानाच्या यशस्वितेसाठी उमाकांत कांडेकर व राजेंद्र कोल्हे यांनी परिश्रम घेतले. यावेळी वन विभाग व वन्यजीव विभागातील अधिकारी-कर्मचारी, तरुणाई फाऊंडेशन, नवसंकल्प ग्रुप आणि वर्ल्ड फॉर नेचरचे कार्यकर्ते उपस्थित होते. सुरेश भालेराव, नाजूकराव उबरहंडे, निवृत्ती गोरे, अमित शेख, वनरक्षक तसेच नारायण पिठोरे, राजेंद्र कोल्हे, उमाकांत कांडेकर, अमोल तायडे, प्रकाश लाहुडकार, बंटी गव्हांदे, संजय गुरव, गणेश कोकाटे आदींनी अभियानात सहभाग घेतला.

**अभियानादरम्यान वाघाची वेशभूषा करून प्रवाशांचे वेधले लक्ष**

अभियानादरम्यान पक्षीमित्र संजय गुरव यांनी वाघाची वेशभूषा करून प्रवाशांचे लक्ष वेधले. जंगलातून प्रवास करताना अजैविक कचरा फेकू नये, वनसंपदा नष्ट होणार नाही याची काळजी घ्यावी आणि वन्यजीवांचे संरक्षण करावे, असा संदेश त्यांनी दिला. तरुणाई फाऊंडेशनचे अध्यक्ष नारायण पिठोरे यांनी निसर्गसाखळीतील वन्यजीवांचे महत्त्व स्पष्ट केले.

**निसर्ग संवर्धनाचा संदेश**

सादर करण्यात आलेल्या पथनाट्यातून निसर्गातील प्रत्येक घटक एकमेकांना कसा पूरक आहे, तसेच पर्यावरणाचा समतोल बिघडल्यास त्याचे परिणाम संपूर्ण परिसंस्थेवर कसे होतात, याबाबत जनजागृती करण्यात आली. वन विभाग व वन्यजीव विभागाचे सुरेश भालेराव यांनी जंगल, वन्यजीव आणि जैवविविधतेच्या संवर्धनासाठी नागरिकांच्या सक्रिय सहभागाचे महत्त्व अधोरेखित केले. वनक्षेत्रात प्लास्टिक व अन्य कचरा टाकल्याने वन्यजीवांसह पर्यावरणाला धोका निर्माण होऊ शकतो.

# पिकांचे पंचनामे 7 दिवसात पूर्ण करण्याच्या सूचना

प्रतिनिधी ५ ऑक्टोबर

**मेरा बु. :** पावसाचा प्रदीर्घ खंड पडल्याने गुंजाळा परिसरातील सुमारे शेकडो हेक्टर क्षेत्रावरील सोयाबीन पिकांना मोठा फटका बसला आहे. पावसाअभावी खरीप हंगामातील सोयाबीन पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. या पार्श्वभूमीवर शासनाच्या आदेशानुसार गुंजाळा येथे महसूल, कृषी व ग्रामविकास विभागाच्या कर्मचाऱ्यांकडून प्रत्यक्ष शेतात जाऊन नुकसानग्रस्त सोयाबीन पिकांचे पंचनामे करण्यास सुरुवात करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना पारदर्शक व वेळेत मदत मिळावी यासाठी महसूल आणि कृषी विभागाच्या संयुक्त पथकांद्वारे प्रत्यक्ष शेताच्या बांधावर जाऊन हे डिजिटल व प्रत्यक्ष सर्वेक्षण केले जात आहे. यासाठी शासनाकडून त्रिस्तरीय समिती आणि प्रशासकीय पथक तयार करुन तलाठी, कृषी सहाय्यक आणि ग्रामसेवक यांच्या त्रिस्तरीय समितीवर जबाबदारी सोपवण्यात आली असल्याने या कर्मचाऱ्यानी गुंजाळा येथील शेत शिवारात प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन पिकांच्या नुकसानीची अचूक नोंद करण्यासाठी शेतकऱ्यांच्या उपस्थित नुकसान झालेल्या सोयाबीन पिकाचे पंचनामे केले. यावेळी उपस्थित कर्मचाऱ्यांनी सांगितले की, शेतकऱ्यांची स्वाक्षरी बंधनकारक असून सातबारा उतारा आणि ८-अ, बँक खाते पासबुक प्रत, आणि आधार कार्ड, फार्मर आयडी आदी शेतकऱ्यांजवळ असणे आवश्यक आहे. यावेळी कृषी विभागाचे कृषी सहाय्यक गवई, महसूल विभागाचे तलाठी गुंजकर, ग्रामसेवक धनवे, पीक पाहणी सहाय्यक शोधक मोरे यांच्यासह सरपंच सुनील केदार, जगन्नाथ केदार, समाधान केदार, सुधाकर खिल्लारे, सिद्धार्थ गवई, युवराज खिल्लारे आदी शेतकरी उपस्थित होते.

# मलकापूर शहर पोलिसांची अवैध धंद्यांवर धडक कारवाई

## सप्टेंबर महिन्यात ४९३ वाहनचालकांवर कारवाईसह लाखो रुपयांचा दंड वसूल

प्रतिनिधी ५ ऑक्टोबर

**मलकापूर :** शहर व परिसरात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी तसेच बेकायदेशीर धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी मलकापूर शहर पोलिसांनी सप्टेंबर महिन्यात विशेष धडक मोहीम राबवली. पोलीस निरीक्षक गणेश गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली १ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर २०२६ या एका महिन्याच्या कालावधीत गुन्हेगार आणि नियम मोडणाऱ्यांवर धडाकेबाज कारवाया करण्यात आल्या असून यामुळे अवैध धंदेवाल्यांचे धाबे दणाणले आहेत. अमली पदार्थांची खरेदी-विक्री व तस्करी रोखण्यासाठी पोलिसांनी सतर्कता दाखवत एनडीपीएस कायद्यांतर्गत १ गुन्हा दाखल करून एका आरोपीला रंगेहात अटक केली. यासोबतच बेकायदेशीर गोवंश वाहतुकीवर कारवाई करत गोवंश संरक्षण कायद्यान्वये १ गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच शहरात उघड्यावर चालणाऱ्या अवैध धंद्यांवर पोलिसांनी ठिकठिकाणी छापे टाकले. यात जुगार कायद्यांतर्गत ६ केसेस नोंदवून २ हजार २९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच बेकायदेशीर दारूविक्री करणाऱ्यांवर दारूबंदी कायद्यान्वये ६ कारवाया करत ८ हजार ५३० रुपयांचा प्रोव्ही मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे शहरातील वाहतूक व्यवस्था शिस्तबध्द करण्यासाठी पोलिसांनी वाहन तपासणी मोहीम तीव्र केली आहे. या कालावधीत मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या, ट्रिपल सीट, विनाहेल्मेट व कागदपत्रे नसणाऱ्या तब्बल ४९३ वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. या कारवाईतून पोलिसांनी एकूण ३ लाख १२ हजार ८०० रुपयांचा दंड वसूल केला आहे.



» धंद्यांचे समूळ उच्चाटन करणे हे पोलीस प्रशासनाचे प्राथमिक कर्तव्य आहे. गुन्हेगारी कारवाया आणि अवैध व्यवसाय करणाऱ्यांवर यापुढेही अशीच कठोर कारवाई सुरूच राहील. नागरिकांनी कायद्याचे पालन करावे आणि परिसरात कुठलाही अवैध प्रकार आढळल्यास तात्काळ पोलिसांना माहिती द्यावी.

**गणेश गिरी** पोलीस निरीक्षक, मलकापूर शहर

# गो. से. महाविद्यालय NCC युनिटची विद्यापीठ स्तरावर दिमाखदार कामगिरी!

## कॅडेट हर्षल किरण पाटील यांना 'BEST NCC CADET (MAN AWARD) २०२५-२६ पुरस्कार

प्रतिनिधी ५ ऑक्टोबर

**खामगाव :** गो. से. विज्ञान कला व वाणिज्य महाविद्यालय, खामगाव येथील हृष्ट्ट युनिटने विद्यापीठ स्तरावर उल्लेखनीय यश संपादन केले आहे. महाविद्यालयातील हृष्ट्ट कॅडेट हर्षल किरण पाटील यांची संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या च्क्चश्वस्ञ्ज हृष्ट्ट ष्ट्रष्ठश्वञ्ज (रूरह् ऱ्ड्ख्रक्रष्ठ) २०२५-२६ज् या मानाच्या पुरस्कारासाठी निवड झाली. या पुरस्कारामुळे गो. से. महाविद्यालयाच्या हृष्ट्ट युनिटच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. राजर्षी शाहू कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, बुलढाणा येथे आयोजित युवा महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी हा पुरस्कार कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. मिलिंद बारहाते कार्यक्रमाचे उद्घाटक पोलीस अधीक्षक श्री. निलेश तांबे, यावेळी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू मा. डॉ. महेंद्र ढोरे, व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ. विजय नागरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, डॉ. निलेश कडू, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजीव बोरकर यांच्या हस्ते देण्यात आला. या प्रसंगी गो. से. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. एस. तळवणकर, हृष्ट्ट अधिकारी लेफ्ट सुहास मधुकर पिढेकर, हृस्स् जिल्हा समन्वयक डॉ. हनुमंत भोसले तसेच महाविद्यालयाचे पदाधिकारी उपस्थित होते. कॅडेट हर्षल किरण पाटील यांनी हृष्ट्ट मधील शिस्त, नेतृत्वगुण, प्रशिक्षण, विविध सामाजिक व राष्ट्रीय उपक्रमांमधील सहभाग आणि उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर हे यश संपादन केले. हृष्ट्ट अधिकारी लेफ्ट सुहास पिढेकर अशी माहिती यांनी दिली . अध्यक्ष डॉ. सुभाषजी बोबडे च्च्हर्षल किरण पाटील यांना मिळालेला हा पुरस्कार म्हणजे केवळ एका कॅडेटचा सन्मान नसून संपूर्ण गोसे महाविद्यालय आणि हृष्ट्ट युनिटचा गौरव आहे. हृष्ट्ट विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, नेतृत्व, राष्ट्रप्रेम आणि सामाजिक बांधिलकी निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करते. उपाध्यक्ष श्री. प्रकाशजी तांबट च्च्महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच हृष्ट्ट सारख्या उपक्रमांमध्ये सहभागी होऊन आपल्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास साधावा. हर्षल पाटील याला मिळालेला क्चश्वस्ञ्ज हृष्ट्ट ष्ट्रष्ठश्वञ्ज पुरस्कार हा इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे सचिव डॉ. प्रशांत बोबडे च्च्हृष्ट्ट क्षेत्रात विद्यापीठ स्तरावरील हा पुरस्कार मिळणे ही महाविद्यालयासाठी अत्यंत गौरवाची बाब आहे. हर्षलने आपल्या मेहनत, शिस्त आणि समर्पणातून हा पुरस्कार मिळविला आहे. त्याच्या या यशामुळे महाविद्यालयातील इतर हृष्ट्ट कॅडेट्सनाही निश्चितच प्रेरणा मिळेल. गो. से. महाविद्यालयाच्या हृष्ट्ट युनिटने भविष्यातही अशाच प्रकारे उल्लेखनीय कामगिरी करावी, यासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य केले जाईल.ज्ज् या यशाबद्दल अध्यक्ष डॉ. सुभाषजी बोबडे, उपाध्यक्ष श्री. प्रकाशजी तांबट, सचिव डॉ. प्रशांत बोबडे, प्राचार्य डॉ. संजय वराडे , हृष्ट्ट अधिकारी, हृस्स् जिल्हा समन्वयक डॉ. हनुमंत भोसले, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी कॅडेट हर्षल किरण पाटील यांचे अभिनंदन केले. गो. से महाविद्यालय हृष्ट्ट युनिटच्या या यशामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक, सामाजिक व राष्ट्रीय उपक्रमांच्या वाटचालीत आणखी एक मानाचा अध्याय जोडला गेला आहे. अशी सविस्तर माहिती महाविद्यालयाचे प्रसिद्धी प्रमुख प्रा. डॉ. मोहम्मद रागीब देशमुख यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

# सेवा संकल्प अभियान; रुग्णांना आरोग्य शिबिराचा लाभ

## भारतीय जनता पक्षातर्फे राबविण्यात आला उपक्रम

प्रतिनिधी ५ ऑक्टोबर



**खामगाव :** भारतीय जनता पक्षाच्या वतीने खामगाव मतदारसंघात सेवा संकल्प अभियानांतर्गत खामगाव व शेगाव तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांवर आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरांचा शेकडो रुग्णांनी लाभ घेतला. कामगारमंत्री ॲड. आकाश फुंडकर व भाजप सोशल मीडिया राज्य सहसंयोजक सागर फुंडकर यांच्या मार्गदर्शनात सेवा संकल्प अभियान राबविण्यात येत आहे. अभियानातील 'सेवा व आपले योगदान' या उपक्रमाचे संयोजक डॉ. एकनाथ पाटील यांच्या मार्गदर्शनात मतदारसंघातील प्राथमिक आरोग्य केंद्रांत आरोग्य शिबिरे घेण्यात आली.

शिबिरांच्या आयोजनासाठी डॉ. अभिलाष खंडारे, डॉ. तेलंग, डॉ. सोळंकी,डॉ. सागर जाधव, तालुका समुदाय आरोग्य अधिकारी कीर्ती पवार, डॉ. सुनील देवकर, डॉ. मंगल राठोड, डॉ. सुभाष हटकर, रवींद्र गुरव, गजानन तायडे, जया हिवराळे, गव्हाळे, काळे, अंकित चव्हाण, आरोग्य सेविका काझी यांनी सहकार्य केले. गणेशपूर येथील शिबिरात डॉ. एकनाथ पाटील यांच्यासह भाजपचे तालुकाध्यक्ष नरेंद्र शिंगोटे, श्याम पाटेखेडे, माजी पंचायत समिती सदस्य हरसिंग साबळे, वसंत मांडवे, राधेश्याम सरप, सरपंच तेलरकर यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

**विविध आजारांवर उपचार, वैद्यकीय मार्गदर्शन**

महात्मा गांधी जयंतीनिमित्त गणेशपूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आयोजित शिबिरात गर्भवती महिला, पुरुष आणि लहान मुलांची तपासणी करण्यात आली.

विविध आजारांवर उपचार व आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन करण्यात आले. पिंपळगाव राजा, बोथाकाजी, अटाळी, रोहणा, लाखनवाडा आणि गणेशपूर आदी ठिकाणीही ही शिबिरे घेण्यात आली.

# भूजल निर्देशांकानुसार सहा तालुक्यांत ताण!

## दोन तालुके 'मध्यम'; तर चार तालुके 'सौम्य' श्रेणीत

प्रतिनिधी ५ ऑक्टोबर

**बुलढाणा :** पावसाने पाठ फिरवल्यानंतर भूजल पुनर्भरणावरही परिणाम झाला असून, सप्टेंबरअखेरच्या भूजल पातळीच्या विश्लेषणातून १३ पैकी सहा तालुक्यांमध्ये भूजल दुष्काळ निर्देशांकानुसार ताणाची स्थिती समोर आली आहे. मेहकर व सिंदखेडराजा 'मध्यम', तर बुलढाणा, खामगाव, लोणार व शेगाव 'सौम्य' श्रेणीत आहेत. विशेष म्हणजे शेगावमध्ये मागील दहा वर्षांच्या सरासरीच्या तुलनेत भूजल पातळीत सर्वाधिक १.६५५ मीटरची घट नोंदली गेली आहे. दुसरीकडे सात तालुके अद्याप 'सामान्य' श्रेणीत आहेत. मागील दहा वर्षांच्या सरासरीच्या तुलनेत शेगावमध्ये भूजल पातळीत सर्वाधिक घट झाली.

**खामगाव, बुलढाणा, लोणारही सौम्य श्रेणीत !**

खामगाव, बुलढाणा आणि लोणार येथेही दहा वर्षांच्या सरासरीच्या तुलनेत भूजल पातळी कमी झाली आहे; मात्र या तालुक्यांची स्थिती 'सौम्य' आहे. यामध्ये शेगावचा समावेश केल्यास चार तालुके सौम्य श्रेणीत येतात. दुसरीकडे चिखली, देऊळगाव राजा, जळगाव जामोद, मलकापूर, मोताळा, नांदुरा आणि संग्रामपूर हे सात तालुके 'सामान्य' श्रेणीत आहेत.

**मेहकर-सिंदखेडराजात अधिक ताण**

भूजल पातळीतील घटीच्या तुलनेत मेहकरची स्थिती अधिक चिंताजनक आहे. येथे दहा वर्षांच्या सरासरीच्या तुलनेत पातळी १.६०६ मीटरने कमी झाली असून भूजल दुष्काळ निर्देशांकानुसार तालुका 'मध्यम' श्रेणीत गेला आहे. सिंदखेडराजामध्येही १.२५४ मीटरची घट नोंदली गेली असून] हा तालुकाही 'मध्यम' श्रेणीत आहे.

**दहा वर्षांचा संदर्भ**

या विश्लेषणात २०१६ ते २०२५ या दहा वर्षातील सप्टेंबरअखेरच्या भूजल पातळीची सरासरी आधार मानण्यात आली आहे. तिची तुलना सप्टेंबर २०२६च्या स्थितीशी करण्यात आली. त्यामुळे यंदाची भूजलस्थिती नेहमीच्या दीर्घकालीन पातळीच्या तुलनेत कुठे उभी आहे, हे स्पष्ट झाले आहे. आगामी काळात पाणी संकट गडद होणार आहे. त्यामुळे पाण्याचा वापर जपून करावा लागणार आहे.

**आगामी काळात संकट गडद होण्याची चिन्हे**

सप्टेंबरअखेरची भूजलस्थिती पाहता, पावसाळा संपल्यानंतर भूजल पातळी आणखी खालावण्याची शक्यता चिंतेचा विषय ठरू शकते. विशेषतः मध्यम व सौम्य ताणाच्या श्रेणीतील तालुक्यांमध्ये पिण्याचे पाणी आणि शेतीच्या सिंचनाचा प्रश्न अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे. भूजल पुनर्भरणासाठी आता मोठा पाऊस उपलब्ध नसल्याने उपलब्ध स्रोतांवरील अवलंबित्व वाढू शकते.





# ८० व्या वाढदिवसाच्या कोटी-कोटी शुभेच्छा..!



- आशु ॲडव्हर्टायजर्स, अकोला - पुणे.
- आशु आर्ट - अकोला.
- आशु एन्टरप्रायजेस - अकोला.
- आशिष विजय ॲन्ड असोसिएट्स (ॲडव्होकेट्स) - पुणे.
- बिडस्मार्ट प्रा. लिमी. पुणे.
- स्पेक्ट्रास्फिअर पुणे.

Aashoo Group of Business

SPECTRASPHERE — Ideas Beyond Boundaries — PUNE

(आशु ग्रुप ऑफ बिझनेसचे मार्गदर्शक)

## आदरणीय श्री विजयभाऊ लक्ष्मणराव सारभुकन

- संचालक : निशांत मल्टिस्टेट पतसंस्था, अकोला.
- संचालक : नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाईंड, अकोला.
- सदस्य : महाराष्ट्र राज्य सहकारी संघ, पुणे.
- अध्यक्ष : प्रागतिक शिक्षण संस्था, अंजनगांव सुर्जी.
- विश्वस्त : श्री गायत्री परिवार ट्रस्ट, अकोला.
- माजी जिल्हा प्रमुख : शेतकरी संघटना, अकोला.

## यांना ८० व्या वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा व अभिष्टचिंतन

शुभेच्छुक

**विजय सारभुकन मित्र परीवार**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ▪ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135